म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
दा. क. ६९८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
६९८८

IRBK-0106988
IRBK-0106988

# रशियन लोककथा

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
ग्रा. क्र.



# रशियन लोककथा

## भाग चवथा

अनुवादक

प्रभाकर ऊर्ध्वरेषे

म. ग्रं. सं. मुं॰, वाचनालय शाखा.
बा. क्र. ६९८८ आ वि ..............
दि. ...०१-०१ ..................

IRBK-0106988

पी. पी. एच्. बुक
मुंबई ४.

किंमत ७५ नये पैसे

ऑक्टोबर, १९५८

★

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | मूर्ख इवान व त्याचा श्यामकर्ण वारु | १ |
| २. | चतुर वासिलिसा | ९ |
| ३. | हिमदेवाची कहाणी | ३१ |
| ४. | तेजस्वी ससाणा फेनिस्ट | ३७ |


★


जयंत भट यांनीं न्यू एज प्रिंटिंग प्रेस, १९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४ येथें छापून त्यांनीं पी. पी. एच. बुकस्टॉल, १९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४ येथें प्रसिद्ध केलें.



# १. मूर्ख इवान व त्याचा श्यामकर्ण वारु

एक म्हातारा होता. त्याला तीन मुलगे होते. सर्वांत वडील व मधला असे दोन्ही मोठे मुलगे शेतीच्या कामांत तरबेज होते व इतर वेळींहि ते झकास कपडे घालून ऐटीनें मिरवत. पण सर्वांत धाकटा होता त्याचं तंत्र कांहीं निराळचं होतं. सगळेजण त्याला मूर्ख इवान म्हणूनच ओळखत. तो सारा दिवस घरांत चुलीजवळच्या ओट्यावर बसून राही. कधींकाळीं जंगलांत बोरं किंवा फळं वेचायला जायची त्याला लहर येई तेवढाच काय तो घराबाहेर पडायचा.

त्या तिघांचा म्हातारा बाप मरायला टेकला तेव्हां त्यानें तिन्ही मुलांना जवळ बोलावलें व तो त्यांना म्हणाला,

“मी आतां मरणार. पण मी मेल्यावर तीन दिवसपर्यंत रोज रात्रीं तुम्ही माझ्या थडग्यापाशीं मला खाण्यासाठीं भाकरी घेऊन या.”

त्याच दिवशीं म्हातारा मरण पावला व त्याला पुरण्यांत आलें. रात्र झाली तशी सर्वांत थोरल्या मुलाची भाकरी घेऊन जाण्याची वेळ आली. पण त्याला कंटाळा आला होता म्हणून म्हणा किंवा फार भीति वाटली म्हणून म्हणा, तो जायला तयार होईना. म्हणून तो इवानला म्हणाला, “इवान, तूं जर आज माझ्याऐवजी बाबांच्या

थडग्यापाशीं भाकरी घेऊन जाशील तर मी तुला चांगली झकासपैकीं केक आणून देईन."

इवाननें तें कबूल केलं व तो भाकरी घेऊन बापाच्या थडग्यापाशीं आला. ती भाकरी थडग्यासमोर ठेवून तो आतां काय होतं तें पहावं म्हणून तिथेंच बसून राहिला. मध्यरात्रीं बरोबर बाराच्या ठोक्याला त्या थडग्याची जागा दुभंगली व इवानचा वृद्ध पिता थडग्यांतून बाहेर आला. म्हातारा म्हणाला, "कोण आहे तें? माझा थोरला मुलगाच आहे ना? रशियाची काय खबरबात आहे? कुत्रे भुंकताहेत, कीं लांडगे ओरडताहेत, कीं माझीं पोरंबाळं रडताहेत, अशांतला कांहीं प्रकार नाहीं ना?"

इवान उत्तरला, "मी तुमचा मुलगाच आहे, बाबा. अन् रशियांत सर्वत्र शांत व आबादीआबाद आहे."

मग म्हाताऱ्याने पोटभर भाकर खाल्ली व तो पुनः थडग्यांत जाऊन झोपला. इवान परत घरीं जाण्यास निघाला व वाटेंत थोडीं बोरं व फळं वेचून घरीं गेला.

इवान घरीं पोंचला तेव्हां थोरल्या भावानें त्याला विचारलं, "बाबा दिसले का रे तुला तिथें?"

"हो, तर. दिसले कीं!" इवान उत्तरला.

"तूं नेलेली भाकरी खाल्ली त्यांनीं?"

"हो, अगदीं पोटभर खाल्ली!"

दुसरा दिवस संपून रात्र आली. आज भाकरी नेण्याची मधल्या भावाची पाळी होती. पण त्यालाहि आळस आला म्हणा किंवा भीति वाटली म्हणा, पण तो जायला तयार नव्हता. तो इवानला म्हणाला, "इवान, तूं जर आज माझ्याऐवजीं भाकरी घेऊन जाशील तर मी तुला एक झकासपैकीं बुटाचा जोड आणून देईन."

"बरं बरं. मी जातों," इवान उत्तरला.

त्यानें भाकरी घेऊन बापाच्या थडग्याजवळ नेऊन ठेवली व पुढें काय होतें तें पहाण्यासाठीं तो बसून राहिला. मध्यरात्र होतांच म्हातारा थडग्याबाहेर आला व त्यानें विचारलं, "कोण, माझा मधला मुलगा कां? रशियाची काय खबरबात आहे? कुत्र्यांचं भुंकणं, लांडग्यांचं ओरडणं, मुलांबाळांचं रडणं, असले कांहीं तरी प्रकार सुरू नाहींत ना?"

इवान उत्तरला, "मी तुमचा मुलगाच आहे बाबा अन् रशियांत सर्वत्र शांत व आबादीआबाद आहे."

मग म्हाताऱ्यानें पोटभर भाकरी खाऊन तो पुनः थडग्यांत निघून गेला. इवान पुनः कालच्यासारखाच फळं वेचून घरीं गेला व मधल्या भावानें त्याला विचारलं, "तूं नेलेली भाकरी बाबांनीं खाल्ली का रे?"

"खाल्ली तर!" इवान उत्तरला, "पोटभर खाल्ली कीं!"

तिसऱ्या रात्रीं इवानचीच पाळी होती, पण तो वडील भावांना म्हणाला, "काल अन् परवां दोन्ही रात्रीं मीच भाकरी घेऊन गेलों होतों. आज तुम्ही जा, मी घरींच राहून विश्रांति घेतों."

"नाहीं, नाहीं!" भाऊ म्हणाले, "आजसुद्धां तूंच जा, तुला दोन दिवसांची संवय झाली आहे."

"बरं बरं, मी जाईन. मग तर झालं!" इवान म्हणाला.

इवान भाकरी घेऊन गेला व मध्यरात्रींच्या ठोक्याला त्याचे वडील थडग्यांतून बाहेर आले. त्यांनीं विचारलं,

"कोण आहे तें? माझा धाकटा मुलगाच ना? रशियाची काय खबरबात आहे सांग पाहूं. कुत्र्यांचं भुंकणं, लांडग्यांचं ओरडणं, पोरांबाळांचं रडणं, असले प्रकार तर नाहींत ना?"

"मी तुमचा धाकटा मुलगा इवान आहे बाबा. अन् रशियांत सर्वत्र शांत न् आबादीआबाद आहे."

बापानें भाकरी खाऊन संपवली व मग तो इवानला म्हणाला, "इवान, तूं एकट्यानेंच माझी आज्ञा ऐकलीस. तिन्ही रात्रीं तूं न भितां माझ्या थडग्याकडे आलास. आतां तूं मी सांगतों तसं कर. इथून बाहेर पडल्यावर खुल्या माळरानावर जा अन् मोठ्यानें म्हण, 'हे श्यामकर्ण वारु! तूं इथें प्रकट हो!' तूं असं म्हटल्यावर एक घोडा तुझ्यासमोर प्रकट होईल. मग तूं त्याच्या उजव्या कानांत शिरून डाव्या कानांतून बाहेर पड, म्हणजे तुझं रूप अजिबात पालटून तूं अत्यंत रूपवान, रुबाबदार तरुण बनशील. मग तूं त्या घोड्यावर बसून तुला पाहिजे तिकडे जा!"

असं बोलून म्हाताऱ्यानें एक लगाम दिला. तो घेऊन व बापाला नमस्कार करून इवान घरीं गेला. वाटेंत रोजच्याप्रमाणें फळं वेचायला अर्थातूच तो विसरला नाहीं.

इवान घरीं आल्यावर त्याच्या भावांनीं त्याला विचारलं, "आज सुद्धां तुला बाबा दिसले का, इवान?

"हो, दिसले तर!"

" तूं नेलेली भाकरी खाल्ली त्यांनीं ? "

" हो, अगदीं पोटभर खाल्ली. अन् आतां पुनः थडग्याकडे येण्याची गरज नाहीं असंहि त्यांनीं सांगितलं. "

हा प्रकार घडून आला त्याच सुमारास झार बादशाहानें सगळ्या राज्यांत एक दवंडी पिटवली होती. झारची मुलगी राजकन्या लावण्य-प्रभा हिनें स्वयंवर करायचं ठरवलं होतं व त्यासाठीं लग्न न झालेल्या सर्व देखण्या तरुणांना राजदरबारांत निमंत्रण देण्यांत आलं होतं. राज-कन्येनं पतीची निवड करण्यासाठीं एक विचित्र पण लावला होता. तिनें बारा खांब व बारा तुळयांचा एक भव्य वाडा बांधवून घेतला होता. या बारा मजली वाड्याच्या सर्वांत वरच्या मजल्यावर एक खिडकी होती. त्या खिडकींत राजकन्या बसणार होती. जो कोणी युवक आपल्या घोड्यावरून तितक्या उंच उडी मारून खिडकींत बसलेल्या राजकन्येच्या मस्तकाला स्पर्श करील त्याच्या गळयांत राजकन्या माळ घालणार होती. हा पण जिंकणारा तरुण श्रीमंत कुळांतला असो वा गरीब कुळांतला असो, त्याला आपण राजकन्या देऊं व अर्धे राज्य आंदण म्हणून देऊं, अशीहि झारच्या दवंडींत घोषणा करण्यांत आलेली होती.

इवानच्या दोन्ही वडील भावांनीं ही घोषणा ऐकून आपलं नशीब अजमावण्यासाठीं स्वयंवराला जायचं ठरवलं होतं. त्या दोघां भावांनीं आपापल्या घोड्यांना चण्याचा खुराक देऊन व स्वतः रुबाबदार कपडे घालून स्वयंवराला जाण्याची तयारी केली. त्यांची ही तयारी पाहून चुलीच्या ओट्यावर आराम करीत पडलेला इवान त्यांना म्हणाला, "मला न्या ना रे बरोबर ! मी सुद्धां स्वतःचं नशीब अजमावीन म्हणतो !"

ते भाऊ हंसून कुचेष्टेच्या स्वरांत म्हणाले, " दिवे ओवाळा, दिवे ! म्हणे मी येतो ! मूर्ख कुठला ! तूं बैस तिथेंच चुलीच्या ओट्यावर ! नाहींतर जंगलांत जाऊन बोरं नि चिंचा वेच, जा ! "

मग ते दोघे भाऊ आपल्या उमद्या घोड्यांवर स्वार झाले व आपल्या कुरळ्या केसांवर कलत्या टोप्या ठेवून, तोंडानें शीळ घालीत मोठ्या ऐटींत झारच्या राजवाड्याच्या दिशेनें निघाले. त्यांचे घोडे धूळ उडवीत दिसेनासे झाल्यावर मग इवान ओट्यावरून उठला. वडिलांनीं दिलेला लगाम बरोबर घेऊन तो बाहेर खुल्या माळरानांत जाऊन उभा राहिला व वडिलांनीं सांगितल्याप्रमाणें मोठ्यानें म्हणाला,

" हे श्यामकर्ण वारु ! तूं इथें प्रकट हो ! "

अन् हे शब्द उच्चारून होतांच एक अत्यंत उमदा घोडा समोरून धांवत येऊन इवानच्या समोर उभा राहिला. तो इतक्या वेगानें धांवत आला कीं त्याच्या पायाखालची जमीन हादरत होती, त्याच्या नासिकाग्रांतून श्वासोच्छ्वासांबरोबर ज्वाळा बाहेर येत होत्या, व त्याच्या कानांतून धुराचे लोट निघत होते. तो घोडा इवानच्या समोर येऊन ताठ उभा राहिला व हुबेहूब माणसासारख्या आवाजांत म्हणाला,

" आपली काय इच्छा आहे, महाराज ? "

इवाननें त्या घोड्याला प्रेमानें थोपटलें, हातांतला लगाम त्याच्या तोंडांत अडकवला व मग त्याच्या उजव्या कानांतून शिरून डाव्या कानांतून बाहेर आला. अन् त्यायोगें त्याच्यांत एकदम इतका आश्चर्यकारक बदल घडून आला व त्याचं रूप इतकं पालटलं कीं तो कधींकुणी पाहिला नसेल असा रूपवान व रुबाबदार तरुण दिसूं लागला. मग तो त्या घोड्यावर स्वार झाला व झारच्या वाड्याकडे निघाला. दऱ्या, खोऱ्या, पर्वत, शहरं, सगळे भराभर मागें टाकून इवानचा श्यामकर्ण वारु झारच्या राजवाड्यांत येऊन पोंचला.

इवान तेथें येऊन पोंचला तेव्हां राजवाड्याचं पटांगण माणसांनीं नुसतं फुलून निघालं होतं. तिथेंच बाजूला राजकन्येनं मुद्दाम बांधवून घेतलेला बाराखांबी, बारा तुळ्यांचा बारा मजली भव्य वाडा होता, व सर्वांत वरच्या मजल्यावरील खिडकींत राजकन्या लावण्यप्रभा बसलेली होती.

स्वयंवराची जय्यत तयारी झाल्यावर झार बादशहाची स्वारी पुढें आली व त्यानें तिथें स्वयंवरासाठीं जमलेल्या सर्व तरुणांना उद्देशून भाषण केलं. झार म्हणाला,

" तरुणांनो ! राजकन्येचा पण तुम्हांला माहीतच आहे. तुमच्यापैकीं जो कोणी आपल्या घोड्यावरून त्या तिथपर्यंत उडी मारून तिच्या मस्तकाला स्पर्श करून येईल, त्याच्या गळ्यांत ती माळ घालील. आणि मीहि त्या तरुणाशीं खुषीनें तिचं लग्न लावून देऊन वर माझं अर्धं राज्य आंदण देईन. "

अन् मग राजकन्येशीं लग्न करूं इच्छिणाऱ्या असंख्य तरुणांनीं एकामागून एक पुढें सरसावून राजकन्या बसली होती तितक्या उंच घोड्याची उडी मारण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! कुणा एकाचीहि उडी तितक्या उंच पोंचूं शकली नाहीं. इवानच्या दोन भावांनीं पण जिंकण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनाहि इतरांप्रमाणेंच अपयश आलें.

अखेर इवानची पाळी आली. त्यानें आपल्या श्यामकर्ण वारूची पाठ थोपटून उंच उडी घेतली. पहिल्या प्रयत्नांत तो घोडा दहाव्या मजल्यापर्यंत पोंचला. दुसऱ्या प्रयत्नांत त्यानें आणखी एक मजला पार केला. मग तिसरी अन् अखेरचीच संधी शिल्लक राहिली. इवाननें त्या घोड्याला खालीं मैदानांतच खूप गोल फिरवलें, इतक्या जोरानें फिरवलें कीं त्याच्या तोंडांतून वाफा निघूं लागल्या. अन् मग त्या घोड्यानें अग्निज्वाळेसारखी अशी उंच उडी घेतली कीं तो थेट राज. कन्या बसली होती त्या खिडकीपर्यंत उंच उडाला व इवाननें राजकन्या लावण्यप्रभेच्या मस्तकावरील रेशमासारख्या मऊ केसांना स्पर्श केला व मग तो खालीं आला. त्यानें पण जिंकलेला पहातांच राजकन्येनेंहि चपळाई करून आपल्या मुद्रिकेची खूण त्याच्या कपाळावर उठवून टाकली.

त्या उमद्या तरुणानें पण जिंकतांच तिथें जमलेल्या लोकांनीं अत्यंत हर्षानें व उत्साहानें त्याचा जयजयकार केला व त्याचा घोडा जमिनीवर उतरला तिकडे लोक धांवले. पण काय! लोक तेथें पोंचण्यापूर्वींच इवाननें घोड्याला टांच देऊन तिथून जी धूम ठोकली तों थेट खुल्या माळरानावर येऊन मगच त्यानें घोडा थांबवला. तिथें पोंचतांच इवान खालीं उतरून त्या श्यामकर्ण वारूच्या डाव्या कानांत शिरून उजव्या कानांतून बाहेर पडला. अन् काय! इवानचं नवं रूप जाऊन तो पुनः पूर्वीसारखा दिसूं लागला होता. तें होतांच इवाननें श्यामकर्ण वारूला निरोप देऊन आल्या वाटेनें परत पाठवलं व तो स्वतः घरीं परतला. मात्र घरीं जातांना वाटेंत बोरं अन् फळं वेचायला थांबण्याचं तो विसरला नाहीं.

घरीं येतांच इवान नेहमींप्रमाणें चुलीजवळच्या ओट्यावर आराम करीत पडून राहिला.

कांही वेळानें इवानचे दोन्ही भाऊ घरीं परत आले. आपण कुठें गेलों होतों व काय काय पाहिलं याचं ते दोघे भाऊ इवानजवळ रसभरीत वर्णन करूं लागले. ते सांगूं लागले, "राजकन्येचा पण जिंकण्याच्या इच्छेनें अनेक तरुण तिथें जमले होते. पण त्यांतला एक फारच रूपवान, देखणा, अगदीं राजबिंडा तरुण होता. त्यानेंच आपला उमदा घोडा वरच्या मजल्यापर्यंत उडवून राजकन्येच्या मस्तकाला स्पर्श केला. पण नंतर तो अचानक असा अदृश्य झाला कीं कुणाला पत्ताच

नाहीं! त्याला आलेला सर्वांनीं पाहिला, पण तो जातांना कुणालाच दिसला नाहीं!"

इवान ओट्यावरच पडल्या पडल्या म्हणाला, "तुम्ही ज्याला पाहिलंत तो रूपवान तरुण मीच तर नव्हतों?"

दोन्ही भाऊ चिडून म्हणाले,

"गप बैस मूर्खा! तिथें ओट्यावर बसून बोरं खा, अन् जास्त मूर्खासारखा बडबडूं नकोस!"

इवाननें हळूंच कपाळाला बांधून ठेवलेली चिंधी सोडली. राजकन्या लावण्यप्रभेनें आपल्या मुद्रिकेची खूण उठवली होती तीच जागा त्यानें चिंधीनें बांधून ठेवलेली होती. चिंधी सोडतांच त्या मुद्रिकेच्या खुणेंतून अग्निज्वाळेसारखें तेज फांकूं लागलें. इवानचे भाऊ घाबरून ओरडले, "ए गाढवा! हें काय करतो आहेस तूं? आपल्या झोपडीला आग लावायचा विचार आहे वाटतं!"

इवाननें पुनः चिंधी बांधून टाकली व तो ओट्यावर स्वस्थ पडून राहिला.

दुसऱ्या दिवशीं झारनें पुनः दवंडी पिटवून सर्व प्रजाजनांना मेजवानीचं आमंत्रण दिलं. सरदार, जहागीरदार, श्रीमंत, गरीब, तरुण, म्हातारे, स्त्रिया, पुरुष, सर्वांनाच निमंत्रण होतं.

इवानचे दोन्ही भाऊ जायला निघाले तसा इवान त्यांना म्हणाला,

"मलाहि घेऊन चला ना रे मेजवानीला!"

दोघेहि भाऊ कुचेष्टेनें हंसून म्हणाले, "वा रे वा! सूरत तर पहा बेट्याची! म्हणे मला घेऊन चला! सगळे लोक हंसतील मात्र तुझा अवतार पाहून! तें कांहीं नाहीं. तूं आपला ओट्यावर बसून बोरं खा!'

ते दोघे भाऊ आपल्या उमद्या घोड्यावर स्वार होऊन झारच्या राजवाड्याकडे रवाना झाले. नंतर इवान उठला व भावांच्या मागोमाग पायींच निघाला. तो झारच्या राजवाड्यांत आल्यावर एका कोपऱ्यांत बसून राहिला.

राजकन्या लावण्यप्रभा स्वतः सर्व पाहुण्यांना वाढण्यास निघाली. ती प्रत्येकाच्या कपाळाकडे निरखून पहात होती. आपल्या मुद्रिकेची खूण कुणाच्या भालप्रदेशावर आढळते का हें पहाण्याचाच तिचा उद्देश होता.

सगळे पाहुणे झाल्यावर अगदीं शेवटीं ती कोपऱ्यांत वसलेल्या इवानजवळ येऊन पोंचली. त्याचं सगळं अंग मातीनें व काजळीनें मांखलेलं होतं व त्याचे केस पिंजारलेले होते. त्याला पाहून राजकन्येला शंका आली. तिनें त्याला विचारलं,

"तूं कोण रे बाबा ? कुठून आलास तूं ? अन् तुझं कपाळ चिंधीनें बांधलेलं काय म्हणून ?"

"कांहीं नाहीं. मी चालतांना पडलों त्याची जखम झाली !" इवान उत्तरला

राजकन्येनं पुढें होऊन इवानच्या कपाळाची चिंधी सोडली. चिंधी निघतांच एकदम असं तेज फाकलं कीं सगळा राजवाडा लख्ख उजळून निघाला.

"हीच माझ्या मुद्रिकेची खूण !" राजकन्या ओरडली. "हाच माझा नियोजित पति !"

झार पुढें आला व इवानकडे न्याहाळून पाहून म्हणाला, "छे पोरी ! हें शक्य नाहीं ! हा तर सारा काजळीनें मांखलेला कुणीतरी अगदीं दरिद्री इसम दिसतोय !"

मग इवान म्हणाला, "मला माझं तोंड धुवायचं आहे, मग पहा तुम्ही."

झारनें तें मान्य केल्यावर इवान उठून पटांगणांतल्या खुल्या जागीं आला व तो जोरानें म्हणाला,

"हे श्यामकर्ण वारु ! तूं इथें प्रकट हो !"

लगेच तो उमदा घोडा चारी खुरांवर धांवत येतांना दिसूं लागला. त्याच्या धांवण्यानें सगळी धरती हादरत होती, त्याच्या नाकपुड्यांतून ज्वाळा निघत होत्या व कानांतून धुराचे लोट बाहेर येत होते. तो घोडा सरळ इवानसमोर येऊन थांबतांच इवान त्याच्या उजव्या कानांतून शिरून डाव्या कानांतून बाहेर आला. तो बाहेर आला तेव्हां त्याचं रूप अजिबात पालटून जाऊन तो अत्यंत देखणा, राजबिंडा तरुण दिसूं लागला होता. त्याचं रूप पाहून सर्व लोक थक्क झाले व राजकन्येचा पण जिंकणारा युवक हाच हें सर्वांना तात्काळ कळून आलं.

आतां बोलणं व चर्चेचा प्रश्नच नव्हता. राजकन्या लावण्यप्रभेचं मोठ्या समारंभानें इवानशीं लग्न झालं व त्यानिमित्त भली जंगी मेजवानी होऊन सर्वत्र आनंदीआनंद झाला.

—:०:—



# १. चतुर वासिलिसा

एक शेतकरी होता. एका वर्षीं त्यानें शेतांत धान्याची पेरणी केली व नंतर इतकें भरघोस पीक आलें कीं त्याची कांपणी करून तें भरून नेतांनेतांच तो पार दमून गेला. त्यानें धान्याच्या पेंढ्या करून त्या गाडींतून घरीं नेल्या व कोठार भरून टाकलें. इतकं विपुल धान्य झाल्यावर साहाजिकच तो शेतकरी हर्षित होऊन उद्‌गारला, ‘बस ! आतां मला काळजीचं कारण नाहीं !’

पण झालं काय कीं एक उंदीर व एक चिमणी यांनीं त खच्चून भरलेलं धान्याचं कोठार पाहिलं व रोज त्या दोघांनींहि त्या कोठाराला भेट देण्याचा कार्यक्रम सुरू केला. तीं दोघेंहि रोज चारपांचदां कोठारांत येत, पोटभर दाणें खात व मग उंदीर आपल्या बिळांत आणि चिमणी आपल्या घरट्यांत परत जाई. आणि हा त्यांचा कार्यक्रम थोडेथोडके दिवस नाहीं तर चांगला तीन वर्षेपर्यंत चालला होता. आणि या कालावधींत साहाजिकच त्यांची आपसांत चांगली दोस्ती जमली होती.

पण तीन वर्षांनंतर कोठारांतलं धान्य संपत आलं तसा उंदरानें विचार केला कीं आतां हे थोडेच दाणे उरले आहेत तें चिमणीच्या हातीं न लागू देतां आपणच सगळे घेऊन जावे. असं ठरविल्यावर एका रात्रीं

उंदरानें जमिनीला भोंक पाडून कोठारांतलं सगळं उरलेलं धान्य आपल्या बिळांत पळविलं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं न्याहारीसाठीं म्हणून चिमणीबाई कोठारांत आल्या तो काय! तिथं नांवाला सुद्धां दाणा शिल्लक नव्हता. चिमणी बिचारी तशीच उपाशीं परतली. पण तिनें उडतां उडतां मनाशीं विचार केला कीं या उंदराला चांगला धडा शिकवलाच पाहिजे. म्हणून तिनें पशूंचा राजा सिंहराज याच्याकडे तक्रार नेऊन न्याय मागण्याचें ठरविलें.

चिमणी सिंहाच्या गुहेंत पोंचली व त्याला म्हणाली, "सिंहमहाराज, आपण पशूंचे राजे आहांत. आपल्या राज्यांतला एक प्राणी गेलीं तीन वर्षं माझा मित्र होता. तो म्हणजे उंदीर. तीन वर्षंपर्यंत आम्हीं एकाच कोठारांतलें दाणे फस्त करीत होतो. या काळांत आमचं कधीं भांडण झालं नाहीं कीं तंटा झाला नाहीं. पण कोठारांतले दाणे संपत आले तेव्हां या उंदरानें विश्वासघात करून एका रात्रींतून सगळे दाणे पळविले व त्यामुळें माझ्यावर उपासमारीची पाळी आली. आपणच याबाबतींत न्याय द्यावा अशी माझी नम्र विनंती आहे. आणि आपण न्याय दिला नाहीं तर मात्र मला आम्हां पक्षांचे राजे गरुडमहाराज यांच्याकडे जाऊन न्याय मागावा लागेल."

सिंहानें ऐटींत उत्तर दिलें, "जाणार तर जा! चल नीघ इथून अन् जा उडत!"

चिमणी बिचारी तशीच उडत गरुडाकडे गेली. उंदरानें आपल्याला कसं फसवलं याची सर्व हकीकत तिनें सांगितली व सिंहानें न्याय देण्याचं नाकारलं हेंहि सांगितलं. ती हकीकत ऐकून गरुडराजांना संताप आला व त्यांनीं लगेच सिंहाला निरोप पाठविला कीं दुसऱ्या दिवशीं अमुक अमुक मैदानावर आपले सगळे पशू घेऊन हजर व्हा, तिथेंच आपणहि आपल्या सगळ्या पक्षांची फौज घेऊन येऊं व मग लढाई सुरू होईल.

हा निरोप मिळतांच सिंहाला युद्धाची तयारी करणें भागच होतें. रणशिंगें व तुताऱ्या वाजवून सगळ्या पशूंची फौज गोळा करण्यांत आली.

दुसऱ्या दिवशीं ठरलेल्या मैदानावर या पशूंच्या फौजेचें आगमन होतांच गरूडराज व त्यांची पक्ष्यांची फौज एखादा प्रचंड ढग कोसळावा तशी पशूंवर तुटून पडली. मग त्या उभय पक्षांत घनघोर संग्राम सुरू झाला. तीन तास अन् तीन मिनिटेंपर्यंत धुमश्चक्री सुरू होती. अखेर

गरूडराजांच्या पक्षांची सरशी झाली व मैदानावर शत्रुपक्षाकडील पशूंच्या प्रेतांचा खच सोडून विजयी पक्षांची फौज घरट्यांकडे परतली. गरूडराज स्वतः मात्र आपल्या फौजेबरोबर न जातां घनदाट जंगलांत निघून गेले. लढाईच्या धुमश्चक्रींत गरुडाला एक मोठी जखम झाली होती. आतां ही जखम कशी भरून काढावी व आपली शक्ति पुनः कशी मिळवावी हाच गरुडापुढें प्रश्न होता. हाच विचार करीत गरुडानें एका भल्या मोठ्या ओक वृक्षाच्या ढोलींत आश्रय घेतला व तेथेंच विश्रांति घेत तो पडून राहिला.

हा सर्व प्रकार घडला त्याला कितीतरी वर्षें लोटलीं. पण त्याच काळांत एक सावकार होता. त्याला मूलबाळ नसल्यामुळें तो व त्याची पत्नी दोघंहि फार दुःखीकष्टी असत. एक दिवस सावकार आपल्या पत्नीला म्हणाला,

"बरं का ग, रात्रीं मला एक फार वाईट स्वप्न पडलं. त्या स्वप्नांत मला असं दिसलं कीं एक भलामोठा पक्षी आपल्या घरीं रहायला आला. त्याची तहानभूक इतकी प्रचंड होती कीं त्यानें एक सबंध बैल खाऊन फस्त केला व मधानें भरलेलें एक पिंप रिकामं केलं. पण इतकंहि करून तो कांहीं जाईना तेव्हां त्याला खाऊंपिऊं घालणं आपल्याला भागच पडलं. फारच वाईट स्वप्न होतं तें. त्यामुळें माझं मन फारच उदास झालं आहे. मला वाटतं आतां मी जरा रानांत फेरफटका करून येतों. म्हणजे मला थोडं बरं वाटेल."

मग सावकारानें बंदूक खांद्यावर टाकून जंगलाचा रस्ता धरला. तो खूप खूप भटकला व अखेर वर सांगितलेला गरूड पक्षी ज्या ओक वृक्षाच्या ढोलींत विश्रांति घेत पडला होता तिथेंच तो येऊन पोंचला. झाडावरचा गरूड पक्षी पाहून त्यानें बंदूक हातीं धरून तो नेम मारणार तेवढ्यांत तो पक्षी माणसासारख्या आवाजांत बोलूं लागला व काकुळतीच्या स्वरांत सावकाराला म्हणाला,

"हे भल्या गृहस्था! माझ्यावर दया कर. मला गरिबाला मारून तुला काय मिळणार? त्यापेक्षां तूं मला घरीं घेऊन चल व तीन वर्षें, तीन महिने व तीन दिवस माझा सांभाळ करून मला खाऊं पिऊं घाल, म्हणजे मला पूर्वीइतकं बळ येईल आणि मग मी तुला इनाम देऊन तुझ्या उपकाराची फेड करीन."



अनुक्रम
विभाग

हा यःकश्चित पक्षी काय मोठं इनाम देणार, असा विचार करून सावकारानें बंदूक सज्ज केलीच. पण तेवढ्यांत गरूड पक्षानें पुनः सावकाराची करुणा भाकली. आणखी एकदां पूर्वीसारखाच प्रकार झाल्यावर सावकारानें गरुडाची शिकार करण्याचा विचार सोडून दिला व तो त्या पक्षाला घेऊन घरीं आला. नंतर त्यानें एक बैल मारला व एक पिंपभर मध काढला. एवढे पदार्थ त्या गरुडाला बरेंच दिवस पुरतील असा सावकाराचा अंदाज होता, पण गरुडासमोर ते पदार्थ येतांच त्या पक्षानें एकाच तडाख्यांत त्यांचा फडशा पाडला.

सावकार विचारा श्रीमंत नव्हता. गरूड पक्षाचें हें अचाट खाणेंपिणें त्याला कसें परवडणार? त्यामुळें तो चिंतातुर झाला तेव्हां गरूड पक्षी त्याला म्हणाला,

"हें पहा, तूं असं कर कीं अमुक अमुक मैदानावर जा. तिथें असंख्य पशू मरून पडलेले व जखमी होऊन पडलेले तुला आढळतील. त्यांचीं कातडीं सोलून तीं शहरांत घेऊन जा. त्या कातड्यांची बाजारांत चांगली किंमत येईल. त्या व्यापारांत तुला इतका पैसा मिळेल कीं तुझी व माझी खाण्यापिण्याची चंगळ होऊन शिवाय पुष्कळ धन शिल्लक राहील."

गरूड पक्षानें सांगितल्याप्रमाणें सावकार मैदानांत गेला. तिथें असंख्य पशू मरून व जखमी होऊन पडलेले होते. सावकारानें त्या पशूंचीं कातडीं काढलीं व शहरांत जाऊन तीं कातडीं विकलीं. त्या व्यापारांत त्याला भरपूर लाभ झाला तो पैसा घेऊन तो घरीं परतला.

त्यानंतर एक वर्षाचा काळ लोटला. एक दिवस गरुडानें सावकाराला म्हटलं कीं उंच ओक वृक्ष आहेत तिथें मला घेऊन चल. सावकारानें गाडीला घोडा जोडून गाडींतून गरुडाला त्या जागीं नेलं. गरुडानें उंच भरारी मारून आकाशांत उड्डाण केलं व आपल्या छातीनें एका ओक वृक्षाच्या शेंड्याला टक्कर दिली. क्षणार्धांत तें झाड मोडून त्याचे दोन तुकडे झाले. पण गरूड पक्षी सावकाराला म्हणाला, "अं हं! अजून मला पूर्वीइतकं बळ आलं नाहीं. तुला अजून एक वर्षभर माझा प्रतिपाळ करावा लागेल."

अशा रीतीनें दुसरं वर्ष निघून गेलं. पुनः तो गरूड पक्षी सावकाराच्या गाडींतून त्या जागीं गेला व त्यानें आकाशांत उड्डाण करून ओक वृक्षाशीं टक्कर घेतली. यावेळीं झाडाच्या शेंडा मोडून

खालीं कोसळला. तेव्हां गरूड पक्षानें सावकाराला सांगितलं कीं त्याला पूर्वीसारखी शक्ति येण्यासाठीं अजून एक वर्ष वाट पहाणं भाग आहे.

अशा प्रकारें एकूण तीन वर्षं, तीन महिने व तीन दिवसांचा संपूर्ण काळ संपून गेला. मग पुनः गरूड पक्षी सावकाराला म्हणाला, "आतां चल मला घेऊन त्या जागीं."

मग गरुडानें पूर्वींपेक्षांहि उंच उड्डाण केलं व आपलं सर्व बळ एकवटून सर्वांत मोठ्या ओक वृक्षाला असा प्रचंड तडाखा हाणला कीं तो वृक्ष शेंड्यापासून मुळापर्यंत पार छिन्नभिन्न झाला, एवढंच नव्हे तर तें सारं रान जोरानें हादरलं.

मग गरूड पक्षी सावकाराला म्हणाला, "आतां मला पूर्वीइतकी ताकद आली आहे. आणि तूंच माझी सेवाशुश्रुषा करून मला हें बळ पुनः प्राप्त करून दिलंस याबद्दल मी तुझा फार फार आभारी आहे. तूं आतां घोड्यावरून उतर अन् माझ्या पाठीवर स्वार हो. मी तुला माझ्या निवासस्थानीं घेऊन जाऊन तुझ्या दयाळूपणाचं योग्य बक्षीस देईन."

सावकार पाठीवर बसतांच तो गरूड पक्षी उंच उडूं लागला व त्यानें निळा समुद्र गांठला. त्या समुद्रावरून उड्डाण करीत असतां गरूड पक्षी सावकाराला म्हणाला, "हा निळा समुद्र पाहिलास? किती मोठा दिसतो आहे तुला तो?"

"गाडीच्या चाकाएवढा!" सावकार उत्तरला.

गरूड पक्षानें एकदम सावकाराला पाठीवरून भिरकावून दिलं व त्याला मृत्युमुखांत पडत असल्याचा अनुभव आणून दिला. मात्र तो सावकार पाण्यांत पडण्यापूर्वींच गरुडानें खालीं गिरकी मारून त्याला पुनः पाठीवर घेतलं.

मग गरुडानें आणखी उंच उड्डाण करून पुनः सावकाराला विचारलं,

"आतां केवढा मोठा दिसतो समुद्र?"

"आतां कोंबडीच्या अंड्याएवढा दिसतो."

पुनः गरुडानें सावकाराला खालीं फेकलं व पुनः तो पाण्यांत पडण्यापूर्वीं त्याला पाठीवर घेऊन पूर्वींपेक्षांहि उंच भरारी मारली. खूपच उंच गेल्यावर त्यानें पुनः सावकाराला प्रश्न केला,

"हं, नीट पहा समुद्राकडे! आतां केवढा दिसतो?"

" आतां मोहरीएवढा दिसतोय !"

आणखी एकदां गरुडानें सावकाराला खालीं फेंकून पुनः पाठीवर घेण्याचा प्रयोग केला व मग त्याला विचारलं, " भल्या गृहस्था ! आतां तरी मृत्यु समोर उभा ठाकला म्हणजे काय वाटतं याची नीट कल्पना आली का तुला ?"

सावकार म्हणाला, " हो, आली खरी. माझा अंत जवळ आला असंच मला वाटलं होतं."

" होय ना ?" गरूड म्हणाला. " तूं माझ्यावर बंदुकीचा नेम धरलास त्या क्षणीं मला काम वाटलं असेल याची तुला जाणीव व्हावी म्हणूनच मी असं केलं."

इतकं बोलून गरूड पक्षानें सावकाराला पाठीवर घेऊन निळा समुद्र पार केला व मग ते ताम्रदेशांत येऊन पोंचले. तिथें आल्यावर गरूड सावकाराला म्हणाला, " या देशांत माझी थोरली बहीण राहाते. तिचे पाहुणे म्हणूनच आपण तेथें राहणार आहोंत. ती तुला पुष्कळ वस्तु भेट म्हणून देईल, पण तूं त्यांतलं कांहीं घेऊं नकोस. तूं फक्त तांब्याचा ताईत तिच्याजवळ माग."

गरुडानें सावकाराला अशी सूचना देऊन ठेवल्यावर तो जमिनीवर आला व लगेच त्यानें एका राजबिंड्या तरुणाचें रूप धारण केलें. मग तो सावकाराला घेऊन बहिणीच्या घराकडे निघाला. त्याला पाहून बहिणीला फारच आनंद झाला. तिनें प्रेमानें त्यांचें स्वागत केलें व ती भावाला म्हणाली,

" खरंच भाऊ, तूं सुखरूप परत आलास ही देवाची दयाच म्हटली पाहिजे. गेल्या तीन वर्षांत तुझा पत्ताच नव्हता तेव्हां मी तर तूं हयात नाहींस असंच धरून चाललें होतें."

भाऊ म्हणाला, " ताई, माझी चौकशी पुरे झाली. मी तर घरचाच आहे. या माझ्या मित्राचं तूं स्वागत करायला पाहिजेस. यांनींच गेलीं तीन वर्षं मला खाऊंपिऊं घालून माझा प्रतिपाळ केला म्हणून मी आज तुला दिसतो आहे."

बहिणीनें त्या दोघांना सुंदर आसनांवर बसवून त्यांना उंची पक्वान्नांची मेजवानी दिली. नंतर ती त्या उभयतांना आपल्या

खजिन्याच्या खोलींत घेऊन गेली व तिथला उंची जडजवाहिरांचा व सोन्यामोत्यांचा ढीग त्यांना दाखवला. ती सावकाराला म्हणाली,

"इथें जें कांहीं सोनंनाणं, हिरे–मोती आहेत, त्यांतलं तुम्हांला पाहिजे तें व हवं तितकं खुशाल घ्या."

सावकार म्हणाला, "मला सोनंनाणं, हिरेमोती, यांतलं कांहींएक नको. देणारच असाल तर तो तांब्याचा ताईत तेवढा मी घेईन."

"अस्सं काय !" बहीणबाई चिडून म्हणाल्या. "ताईत हवा काय ? तो साफ मिळणार नाहीं !"

वहिणीच्या या उद्धटपणाचा भावाला फार राग आला व त्यानें पुनः गरुडाचें रूप धारण केलें व सावकाराला पाठींवर घेऊन आकाशांत उड्डाण केलें.

मग मात्र बहीण घाबरली व ओरडून म्हणाली,

"भाऊ, भाऊ ! परत ये बरं ! मी तुझ्यासाठीं तो ताईत द्यायला सुद्धां तयार आहे."

पण गरूड उत्तरला, "नाहीं ताई ! तूं फार उशीर केलास. आतां कांहीं नको !"

गरुडानें पुढें झेप घेतली व मग तो सावकाराला म्हणाला, "जरा मागें वळून पहा अन् मग समोर काय दिसतं आहे तें पहा !"

सावकारानें मागेंपुढें नजर टाकली व तो म्हणाला, "मागें सर्वत्र आगीचे लोळ अन् समोर फुलाचे ताटवे दिसताहेत."

"बरोबर !" गरूड म्हणाला. "आगीचे लोळ दिसताहेत तो ताम्रदेश जळून खाक होत आहे व समोर फुलांचे ताटवे दिसताहेत तो माझी मधली बहीण राहाते तो रौप्यदेश आहे. आपण आतां तिच्या घरीं जाऊं. तीसुद्धां तुला पुष्कळ गोष्टी भेट म्हणून देईल, पण त्या कांहीं न घेतां फक्त रुप्याचा ताईत मागून घे."

रौप्यदेशांत येऊन पोंचल्यावर गरुडानें पुनः राजबिंड्या तरुणाचें रूप धारण केलें व तो सावकाराला घेऊन मधल्या बहिणीच्या घरीं गेला.

बहिणीनें भावाचें हर्षानें स्वागत केलें व ती म्हणाली, "भाऊ, तूं इतके दिवस कुठें होतास बाबा ? आलास कधीं अन् कुठून ? कुठें गडप झाला होतास इतकीं वर्षे ?"

"माझी चौकशी पुरे झाली ताई," भाऊ म्हणाला. "मी घरचाच आहे. तूं माझ्या या मित्राचं स्वागत कर. यानेंच माझा तीन वर्षं प्रतिपाळ करून मला खाऊंपिऊं घातलं, नाहींतर मी उपाशींच मेलों असतों."

बहिणीनें त्या दोघांना उच्चासनावर बसवून त्यांना उंची पक्वान्नांची मेजवानी दिली. नंतर तिनेंहि वडील बहिणीप्रमाणेंच त्यांना जवाहिरखान्यांत नेऊन सावकाराला हवं तेवढं सोनंनाणं व जडजवाहिर घेण्याची विनंति केली.

पण सावकार म्हणाला, "मला सोनंनाणं, हिरेमोती, कांहीं नको. द्यायचंच असेल तर मी रुप्याचा ताईत फक्त घेईन."

"अस्सं काय!" बहीण चिडून म्हणाली. "भल्या गृहस्था! तुला तो ताईत हवा आहे काय? मग मी साफ सांगतें कीं ताईत मिळणार नाहीं!"

बहिणीच्या या उत्तरानें भाऊ संतापला व त्यानें पुनः गरुडाचें रूप धारण करून सावकाराला पाठीवर घेऊन उड्डाण केलें. बहिणीनें ओरडून त्याला पुनः येण्यास विनवलें व ती ताईत देण्यालाहि कबूल झाली, पण तिला नकार देऊन गरुडराज पुढें निघाले. थोडं अंतर कापल्यावर गरूड सावकाराला म्हणाला, "भल्या गृहस्था! जरा मागें अन् पुढें काय दिसतंय तें तर पहा!"

"मागें आगीचे लोळ अन् समोर फुलांचे ताटवे दिसताहेत मला."

"आगीचे लोळ दिसताहेत तो रौप्यदेश जळून खाक होत आहे, अन् समोर फुलांचे ताटवे दिसतात तो सुवर्णदेश. तिथेंच माझी सर्वांत धाकटी बहीण राहाते, तिच्या घरीं आपण जाऊं. मात्र ती देईल त्यांपैकीं कोणतीहि भेट न घेतां फक्त सुवर्ण ताईत तेवढा मागायचा, आलं ना ध्यानांत!"

सुवर्णदेशांत प्रवेश केल्यावर गरुडानें पुनः राजबिंड्या तरुणाचें रूप धारण केलें व तो सावकाराला घेऊन धाकट्या बहिणीकडे गेला.

बहिणीनें अत्यंत प्रेमानें भावाचं व त्याच्या मित्राचं स्वागत केलं व मग भावाला विचारलं,

"आज माझ्याकडे कसा आलास बाबा? आलास कुठून व कसा? अन् इतके दिवस कुठें होतास?"

"माझी चौकशी मग कर, ताई. मी घरचाच आहे. तूं या माझ्या मित्राचं स्वागत कर. यानेंच तीन वर्षेपर्यंत मला सांभाळलं, खायला प्यायला दिलं. नाहींतर मला उपाशीच काळ कंठावा लागला असतां."

बहिणीनें त्या दोघांना सुंदर आसनांवर बसवून त्यांना थाटाची मेजवानी दिली. नंतर ती सावकाराला जवाहिरखान्यांत घेऊन गेली व तिनें त्याला सोनेंनाणें अन् जडजवाहिर भेट देऊं केलं.

पण सावकार म्हणाला, "मला दुसरं तिसरं कांहींच नको. देणारच असाल तर सुवर्ण ताईत तेवढा मी घेईन."

वहीण म्हणाली, "जरूर घ्या कीं. तो ताईत तुम्हांला भाग्याचा ठरो एवढीच माझी इच्छा आहे. तुम्ही तीन वर्षं माझ्या भावाचा सांभाळ केला, खाऊं पिऊं घालून त्याला उपासमारीपासून वाचवलंत, तेव्हां तुम्ही म्हणाल तें देणं माझं कर्तव्यच आहे."

नंतर मग तो सावकार आणखी कांहीं दिवस त्या सुवर्ण देशांत राहिला. यथेच्छ पाहुणचार घेतल्यावर तिथून जाण्याची वेळ आली तेव्हां गरूड सावकाराला म्हणाला, "बरंय तर. तुम्ही जाणार, पण माझ्यावर राग ठेवूं नका. मात्र घरीं पोंचेपर्यंत ताईत उघडायचा नाहीं हें विसरूं नका."

मग सावकार घरीं जाण्यास निघाला. तो खूप चालून थकल्यावर एके ठिकाणीं विश्रांतीसाठीं थांबला. तो थांबला तिथें एक भलंमोठं कुरण होतं. अन् तो प्रदेश एका दुसऱ्या राजाच्या राज्यांतला होता. तिथें थांबल्यावर सावकारानें सुवर्ण ताईत काढला व तो त्याच्याकडे पहात राहिला. बराच वेळ निरखून पाहिल्यावर मग मात्र त्याला राहावेना व अखेर त्यानें ताईत उघडलाच.

अन् काय चमत्कार पहा! ताईत उघडतांच एक भला मोठा सुंदर राजवाडा त्या जागीं निर्माण झाला व अनेक दासदासी सावकारापुढें हात जोडून सेवेसाठीं हजर झाल्या. त्या विचारूं लागल्या,

"आपली काय आज्ञा आहे सरकार?"

सावकारानें त्यांना खाण्यापिण्याचे पदार्थ हजर करण्यास सांगितलें. त्या आज्ञेचें पालन होतांच तो खाऊनपिऊन विश्रांति घेण्यासाठीं आडवा झाला.

इकडं काय झालं कीं त्या राज्याच्या राजानें आपल्या प्रदेशांत हा नवाच राजवाडा बांधला गेल्याचें पाहिलें व त्यानें नोकरांना बोलावून हुकुम सोडला,

"जा आणि माझ्या परवानगीवांचून असा वाडा बांधण्याची कोणा हरामखोराची हिंमत झाली याचा शोध घ्या! अन् त्या बदमाशाला सांगा कीं माझा संताप अनावर होण्यापूर्वींच इथून चंबुगवाळं आटप, नाहींतर पश्चात्तापाची पाळी येईल!"

सावकाराला हा निरोप मिळाला तेव्हां तो घाबरला. पण तो राजवाडा ज्या ताइतांतून उत्पन्न झाला होता त्यांतच तो पुनः कसा घालावा हें त्याला खूप विचार करूनहि सुचेना. मग त्यानें राजाच्या नोकरांना सांगितलें,

"मलासुद्धां इथून जायचींच इच्छा आहे, पण कसं तें माझं मलाच माहीत नाहीं."

राजाच्या नोकरांनीं हा निरोप जसाच्या तसा आपल्या धन्याकडे पोंचता केला. राजा उत्तरला,

"त्या सावकाराला म्हणावं, तुझ्या घरीं तूंहि अजून पाहिलेली नाहींस अशी जी कांहीं चीज असेल ती मला देण्याचं कबूल कर. म्हणजे मी तुझा वाडा पुनः सुवर्ण ताइतांत घालून देईन."

राजाची मागणी कबूल करण्याखेरीज सावकाराला गत्यंतरच नव्हतं. त्यानें आपल्या घरीं स्वतःला माहीत नसलेली चीज असेल ती राजाला देण्याचं शपथेवर कबूल केलं. मग त्या राजानें लगेच तो राजवाडा सुवर्ण ताइतांत बंद करून सावकाराच्या स्वाधीन केला व मग सावकाराची स्वारी घरीं जाण्यास निघाली.

आणखी पुष्कळ वाटचाल केल्यावर सावकार घरीं पोंचला. घरीं येतांच त्याच्या पत्नीनें त्याला विचारलें,

"इतके दिवस तुम्हीं कुठें गेलां होतात हो?"

"असाच कुठें तरी. पण आतां घरीं आलों ना?"

"तुम्हीं गेल्यावर देवाच्या कृपेनं आपल्याला पुत्रप्राप्ती झाल्याची आनंदाची वातमी सांगायची आहे तुम्हांला."

ही वार्ता ऐकून सावकाराला आनंद होण्याऐवजीं तो दुःखी झाला. कारण हा पुत्र म्हणजेच आपण न पाहिलेली व राजानें मागितलेली चीज आहे, हें सावकारानें ओळखलं. त्याला दुःखी पाहून पत्नीनें विचारलं,

"तुमचा चेहरा असा उतरला काय म्हणून ? घरीं आल्याचा आनंद नाहीं का झाला तुम्हांला ?"

"तें आहे ग, पण—" असें म्हणून सावकारानें पत्नीला आपल्या चिंतेचं कारण सांगितलं.

तीं दोघेंहि मग पुष्कळ रडलीं व डोळ्यांतल्या पाण्याशीं घास खात दिवस कंठूं लागलीं.

पण किती झालं तरी माणसंच तीं. रडून रडून रडणार किती दिवस? हळूहळू दुःखाचा जोर कमी झाला. मग सावकारानें एक दिवस तो सोन्याचा ताईत उघडला व पुनः पूर्वीप्रमाणेंच त्यांतून एक भलामोठा व अतिसुंदर राजवाडा निर्माण झाला. सावकार आपल्या बायकामुलांसह त्या वाड्यांत राहून वैभवांत दिवस कंठूं लागला व त्या आनंदाच्या भरांत त्यांना आपल्या चिंतेचाहि विसर पडला.

अशाच प्रकारें दहा वर्षांहून अधिक काळ निघून गेला. सावकाराचा मुलगाहि या काळांत यथाक्रम वाढीला लागून अतिसुंदर व देखणा दिसूं लागला.

पण मग एक दिवस सकाळींच तो मुलगा झोंपून उठला व दुःखी चेहरा करून पित्याला म्हणाला,

"बाबा, मला काल रात्रीं भयंकर स्वप्न पडलं. त्यांत असं दिसलं कीं एका दुसऱ्या देशाचा राजा होता व तो मला आज्ञा करीत होता कीं ताबडतोब माझ्याकडे निघून ये. आणखी तो म्हणाला कीं तुझ्या बापानें आधींच तुला पाठवायला फार उशीर केला आहे, आतां अधिक थांबायला मी तयार नाहीं."

सावकार व त्याची पत्नी दोघांनीं डोळ्यांतून खूप पाणी गाळलं, पण अखेर नाइलाज म्हणून त्यांनीं मुलाला परमुलुखाला जाण्याची परवानगी दिली.

सावकाराच्या पुत्राचं नांव इवान होतं. इवान आईबापांचा निरोप घेऊन निघाला तो सरळ मोठ्या रस्त्याला लागला. तो खूप खूप चालला. वाटेंत त्यानें अनेक मैदानांतून व पठारावरून वाटचाल केली व अखेर एका दाट जंगलांत येऊन पोंचला. तिथें त्याला समोर एक झोंपडी दिसली. त्या झोंपडीचं तोंड जंगलांतल्या झाडांकडे होतं व मागची बाजू इवानच्या समोर होती. आजूबाजूला वस्तीचं कांहींच चिन्ह नव्हतं. इवान त्या झोंपडीला उद्देशून म्हणाला,

" हे झोंपडी ! तुझी मागची बाजू त्या झाडांकडे व पुढची बाजू मजकडे कर पाहूं ! "

चमत्कार असा कीं झोपडीनें इवानची आज्ञा प्रमाण मानून त्याच्याकडे तोंड फिरवलं.

सावकारपुत्र इवानं आंत शिरला तों त्याला बाबायागा नांवाची चेटकीण तिथें बसलेली दिसली. तिच्या एका हातांत एक केरसुणी व दुसऱ्या हातांत एक झाडाच्या फांदीची लवचिक काठी होती. ती स्वतः म्हणजे नुसता हाडांच्या सांपळ्यासारखी दिसत होती व तिचं नाक भलंमोठं होतं. इवानला पाहून ती म्हणाली,

" कोणीतरी रशियन प्राणी दिसतो आहे, होय ना रे ? आजवर कधीं तुला पाहिलेलं नाहीं मी. पण मला तुझ्या रक्ताचा वास येतोय. कोण तूं ? कोठून आलास? अन् कुठें निघालास ? "

" वा ग वा चेटकिणी ! कुणाहि वाटसरूचं असंच स्वागत करतेस वाटतं ? कांहीं खायलाप्यायला द्यायचं सोडून आधीं प्रश्नांचाच भडिमार ? "

मग बाबायागानें त्याला खायलाप्यायला दिलं व नंतर इवान झोंपी गेला. मात्र दुसऱ्या दिवशीं भल्या पहांटेच ती उठली व इवानला उठवून तिनें त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार सुरू केला. इवाननें तिला आपली सर्व हकीकत सांगितली व मग तो तिला म्हणाला,

" त्या परमुलुखाच्या राजाकडे कसं जायचं तेवढं सांग ना आजी !"

बाबायागा त्याला म्हणाली, " तूं या बाजूला आलास हें तुझं नशीबच समज. तूं इकडे आला नसतास तर तुझा निकालच लागला असता. कारण तूं त्याला फार वाट पहायला लावलीस म्हणून तो राजा तुझ्यावर फार रागावला आहे. बरं, तूं आतां मी सांगतें तसं कर. तूं सरळ त्या समोरच्या वाटेनं जा. तुला एक तळं लागेल. तिथेंच तूं झाडामागें लपून राहा. मग तीन मोठाले बगळे उडत येतांना दिसतील. त्या तीन राजकन्या आहेत. त्या परमुलुखाच्या राजाच्या मुलीच त्या. त्या तळ्याकांठीं उतरून आपले पंख काढून ठेवून व पोषाख उतरून तळ्यांत स्नानाला उतरतील. त्यांपैकीं एकीच्या पंखावर ठिपके असतील. तूं हळूच ते पंख उचलून घे व नंतर त्या पंखाची राजकन्या तुझ्याशीं लग्न करण्याचं वचन देईपर्यंत ते पंख परत देऊं नकोस. बस, तेवढं वचन तूं मिळवलंस कीं सगळं नीट होईल. "

सावकारपुत्र इवान बाबायागाचा निरोप घेऊन निघाला व तिनें सांगितलेल्या वाटेनें चालूं लागला.

चेटकिणीनें सांगितल्याप्रमाणें तळं लागलं. तिथें तो थांबला व एका मोठ्या झाडाच्या आड लपून बसला. थोड्याच वेळानें तीन पक्षी उडत उडत तेथें आले. एका पक्षाच्या पंखावर ठिपकेहि होते. ते पक्षी तळ्याकांठीं उतरले व लगेच त्यांनीं मनुष्यरूप धारण केलं, आणि त्या ठिकाणीं पक्षांच्याऐवजीं तीन सुंदर राजकन्या दिसूं लागल्या. मग त्यांनीं पंख काढून ठेवले, पोषाख उतरून ठेवले व तळ्यांत उतरून जलक्रीडा करूं लागल्या. इवाननें चपळाई करून चेटकिणीनें सांगितल्याप्रमाणें ठिपके असलेले पंख उचलले व तो पुनः झाडाआड लपून बसला. राजकन्यांचें स्नान झाल्यावर त्या बाहेर आल्या व त्यांनीं पुनः कपडे घातले. दोघींचे पंख तिथेंच होते, त्यांनीं पंख लावून आकाशांत उड्डाण केलें पण तिसरी राजकन्या मात्र हरवलेले पंख शोधीत तिथेंच थांबली. खूप शोध करूनहि पंख सांपडेना तेव्हां ती मोठ्यानें म्हणाली,

" कोणी नेले आहेत माझे पंख ? दे बरं ते परत ! ते घेणारा इसम जर वृद्ध असेल तर मी त्याला पिता मानीन, मध्यम वयाचा असेल तर काका म्हणेन, अन् तरुण अन् सुंदर असेल तर मी त्याला माझा पति मानेन. "

हें ऐकून इवान लपल्या झाडाआडून समोर आला व तिला म्हणाला, " राजकन्ये ! हे घे तुझे पंख. "

राजकन्या म्हणाली, " तुम्ही माझे भावी पति आहांत. तुमचे आप्तेष्ट कोण न् कुठें असतात ? अन् तुम्ही आतां कुठें जात आहांत ? "

" मी सावकारपुत्र इवान. अन् तुझ्या पित्याला भेटायलाच मी चाललों आहे. "

" माझं नांव चतुर वासिलिसा. " राजकन्या म्हणाली.

वासिलिसा खरोखरी लावण्यवान व नांवाप्रमाणेंच चतुर होती व पित्याची सर्वांत लाडकीहि होती. तिनें इवानला—आपल्या भावी पतीला—आपल्या वडिलांकडे जाण्याचा मार्ग समजावून सांगितला व मग ती पक्षाचं रूप धारण करून आपल्या बहिणींच्या मागोमाग आकाशांत उड्डाण करूं लागली.

मग इवान तिनें सांगितल्याप्रमाणें त्या राजाकडे जाऊन पोंचला. राजानें त्याला गुलाम बनवून त्याच्याकडून लाकडं फोडणं, पाणी

काढणं, वगैरे कामं घेण्याला सुरुवात केली. इवान हेंहि काम करूं लागलां, पण स्लबरर नांवाच्या आचाऱ्याची त्याच्यावर खपा मर्जी झाली व त्यानें द्वेषबुद्धीनें इवानच्या विरुद्ध राजाचे कान भरण्याला प्रारंभ केला. त्या आचाऱ्यानें राजाला सांगितलं,

"हुजूर, हा सावकारपुत्र इवान फारच वढाईखोर आहे. तो अशा बढाया मारतो कीं आपण एक सबंध जंगल तोडून तीं लाकडं रचायचं, ती जमीन नांगरून पेरणी करायचं, मग गव्हाची कांपणी करून पीठ दळायचं व त्या पिठाची हुजुरांच्या न्याहारीसाठीं सुंदर केक करायचं, अशीं सगळीं कामं एका रात्रींत करून दाखवूं शकतों."

"अस्सं?" राजेसाहेब उद्गारले. "मग त्याला माझ्यापुढें हजर करा पाहूं."

सावकारपुत्र इवानला राजाच्या समोर हजर करण्यांत आलं. राजा त्याला म्हणाला,

"तूं म्हणे फार बढाया मारत असतोस! खरं कां हें? सबंध जंगल तोडून लाकडं रचायचीं, मग ती जमीन नांगरून तिथें पेरणी न कांपणी करायची अन् मग पीठ दळून माझ्या न्याहारीसाठीं केक बनवायची, इतकीं सगळीं कामं म्हणे तूं एका रात्रींत सहज पार पाडूं शकतोस? मग आजच्या रात्रींत हा पराक्रम करून दाखव पाहूं!"

इवाननें अशी बढाई खरोखरच मारलेली नव्हती. आपण अशी बढाई मारलेली नाहीं असं त्यानें परोपरीनें राजाला सांगून पाहिलं. पण राजेसाहेब ऐकेनात. आपला हुकूम पाळलाच पाहिजे असं त्यांनीं इवानला बजावलं.

बिचारा इवान काळजींत पडला व एका बाजूला बसून राहिला. राजकन्या वासिलिसानं त्याला असं चिंतातुर पाहिलं व ती त्याच्याजवळ जाऊन त्याला विचारूं लागली,

"तुम्ही एवढे चिंतातुर कां?"

"तुला सांगून काय उपयोग? तुझी मला काय मदत होणार?"

"पहा तर खरं! मी मदत करूंहि शकेन कदाचित."

मग इवाननें तिला तिच्या वडिलांनीं आपल्यावर कसली अशक्यप्राय कामगिरी सोपवली आहे तें सांगितलं.

तें ऐकून वासिलिसा म्हणाली, "हात्तिच्या, इतकंच! ही कामगिरी म्हणजे तर हातचा मळ आहे. खरी कठीण कामगिरी तर

अजून पुढेंच आहे. पण तुम्ही आतां स्वस्थ झोंपा. कठीण काम सोपं कसं होईल याची युक्ति सुचायला रात्रींसारखी वेळ नाहीं."

इवान झोंपीं गेला. मध्यरात्रीं बाराच्या ठोक्याला वासिलिसा उठली व राजवाड्याच्या बाहेर पायरीवर उभी राहून तिनें मोठ्या आवाजांत हांका मारल्या. क्षणार्धांत सगळीकडून शेतकरी जमा होऊं लागले. त्या सगळ्यांनीं लगेच जंगल तोडून साफ केलं व जमिनीची नांगरणी करून पेरणी करून टाकली, लगेच तिथें हिरवींगार शेतं दिसूं लागलीं व थोड्याच वेळांत तीं पिवळीधमक होऊन कांपणीचं काम सुरू झालं, हजारों लोक तिथें राबत होते व भराभर कामं उरकत होतीं. सकाळ उजाडण्याच्या आंत धान्याची कांपणी व मळणी संपून पीठ दळलं गेलं व त्याच्या सुंदर केकहि तयार झाल्या. मग सावकारपुत्र इवान उठल्यावर तो ती केक राजाच्या न्याहारीसाठीं घेऊन गेला. तें पाहून राजेसाहेब प्रसन्न झाले व त्यांनीं इवानची पाठ थोपटली व त्याला खजिन्यांतून मोठं इनाम देण्याचा हुकूम सोडला.

हा प्रकार पाहून इवानचा द्वेष करणारा आचारी स्लबरर याचा मात्र फार जळफळाट झाला व मग त्यानें इवानविरुद्ध आणखी चहाड्या सांगण्याचा क्रम सुरू केला. एकदां त्यानें राजाला सांगितलं,

"सरकार! सावकारपुत्र इवान आजकाल अशी बढाई मारीत असतो कीं तो एका रात्रींतून एक भलंमोठं जहाज तयार करूं शकतो अन् तें जहाज असं कीं आकाशांतून उड्डाण करूं शकेल."

"अस्सं! आणा तर त्या इवानला इथें!" राजेसाहेबांनीं फर्मावलं.

इवानला राजासमोर हजर करण्यांत आलं.

"तूं म्हणे एका रात्रींतून असं विलक्षण जहाज बनवूं शकतोस कीं तें आकाशांत उड्डाण करूं शकेल? तूं या नोकरांजवळ अशी बढाई मारल्याचं मला समजलं आहे. तुझं हें कसब तूं माझ्यापासून मात्र लपवून ठेवलंस नाहीं? ठीक! आतां उद्यां सकाळला तें तसलं जहाज तयार हवं. समजलास!"

इवाननें कपाळाला हात लावला.

त्याची ती अवस्था पाहून राजकन्या वासिलिसा पुनः त्याच्या-जवळ येऊन त्याला म्हणाली,

" आतां पुनः तुम्ही असे दुःखीकष्टी कां? तुमच्यावर असं कोणतं संकट आलं आहे?"

"काय सांगूं तुला, वासिलिसे? राजानें मला एका रात्रींतून उडणारं जहाज तयार करायला सांगितलं आहे, तर मग मी दुःखीकष्टी होऊं नको तर काय करूं?"

"हात्तिच्या, एवढंच! हें काम तर फारच सोपं आहे. खरी कठीण कामगिरी तर पुढंच आहे. पण तुम्ही स्वस्थ झोपा आतां. रात्रींच्या शांत वेळीं युक्ति सुचेल कांहींतरी."

मध्यरात्रीं बरोबर बाराच्या ठोक्याला वासिलिसा राजवाड्याच्या बाहेरच्या पायरीवर येऊन उभी राहिली व तिनें मोठमोठ्यानें हांका मारल्या. क्षणार्धात असंख्य सुतार आपापलीं अवजारं घेऊन तिथें हजर झाले व लगेच जहाज बनविण्याच्या कामाला लागले. सकाळपर्यंत उडणारं जहाज तयारहि झालं.

तें जहाज पाहून राजेसाहेब प्रसन्न झाले व ते इवानला म्हणाले, "शाबास! आतां आपण या जहाजांतून सफर करूं या!"

मग राजेसाहेबांनीं इवानला व आचारी स्लबररलाहि बरोबर घेऊन जहाजांत पाय ठेवला. तें जहाज लगेच आकाशांत उड्डाण करूं लागलं. कांहीं वेळानें तें जहाज राजाच्या पशुशाळेवर येतांच इवाननें स्लबरर आचाऱ्याला एकदम खालीं ढकलून दिलं. तो दुष्ट आचारी खालीं पडतांच पशुशाळेंतल्या हिंस्र पशूंनीं त्याच्या शरिराचे लचके तोडून त्याचा फन्ना उडवला.

तें होतांच इवान राजाला म्हणाला, "सरकार! स्लबरर आचारी खालीं पडला पहा!"

"ठीक झालं!" राजा म्हणाला, "त्या नीचाला अशीच शिक्षा योग्य होती!"

मग राजेसाहेब इवानला घेऊन राजवाड्यांत परत आले. तिथें येऊन पोंचल्यावर ते इवानला म्हणाले,

"इवान, तूं चांगला हुशार आहेस. तेव्हां आतां तुला एकच कामगिरी सांगतों. ती अशी कीं एक फार उन्मत्त घोडा आहे त्याला काबूंत आणायचं. तेवढी कामगिरी तूं पार पाडलीस कीं माझ्या कन्येशीं तुझं लग्न करून देईन."

इवान मनाशीं म्हणाला, हें काम तर फारच सोपं आहे! अशा विचारानं तो हर्षित होऊन तिथून निघाला.

चतुर वासिलिसेनें तें पाहिलं व तिनें त्याला आनंदाचं कारण विचारलं. त्याचं म्हणणं ऐकून घेऊन ती म्हणाली,

"इवान, तुम्ही खरोखरच मूर्ख आहांत असं म्हटलं पाहिजे. अहो, यावेळीं तुमच्यावर राजानें सोपविलेली कामगिरी खरोखरच फार बिकट आहे. कारण तुम्हांला ज्या घोड्याला काबूंत आणायचंय तो घोडा म्हणजे राजा स्वतःच असणार. राजा घोड्याचं रूप धारण करून तुम्हांला पाठीवर घेईल अन् आकाशांत ढगांपर्यंत इतकं उंच उडवील कीं तुम्ही खालीं पडतांच तुमच्या हाडांचा चक्काचूर झाल्यावांचून राहाणार नाहीं. तेव्हां आतां असं] करा कीं तावडतोब लोहाराकडे जा अन् एक चांगला तीन मण वजनाचा हातोडा तयार करवून घ्यां. मग तुम्ही घोड्यावर स्वार व्हाल तेव्हां पकड चांगली ठेवा अन् त्या घोड्याला काबूंत ठेवण्यासाठीं तो हातोडा त्याच्या मस्तकावर हाणा."

दुसऱ्या दिवशी सइसांनीं घोड्यांच्या पागेतून एक उन्मत्त घोडा बाहेर आणला. तो घोडा असा चौखूर उधळत होता व इतक्या जोरानें खिंचाळत होता कीं त्या नोकरांना त्याला आवरणें कठीण होत होतें. सावकारपुत्र इवान पाठीवर स्वार होतांच त्या घोड्यानें उंच आकाशांत उडी मारून इवानला लांब भिरकावून देण्याचा प्रयत्न केला. पण इवाननें घोड्याच्या पाठीवरील आपली पकड घट्ट ठेवून हातांतला प्रचंड हातोडा घोड्याच्या मस्तकावर हाणण्याचा क्रम सुरू ठेवल्यामुळें घोड्याचा मस्तवालपणा थंडावत जाऊन अखेर त्याला खालीं जमिनीवर पाय टेकणें भाग पडलें. मग इवाननें घोडा सइसांच्या स्वाधीन केला व थोडा वेळ विश्रांति घेऊन तो राजवाड्यांत राजाच्या भेटीसाठीं निघाला.

राजा डोकं घट्ट बांधून घेऊन बसलेला होता. इवान त्याला म्हणाला,

"हुजूर, आपण सांगितल्याप्रमाणें त्या घोड्याला वठणीवर आणण्याची कामगिरी मी पार पाडली आहे."

"ठीक आहे. तुझ्या वधूची निवड करण्यासाठीं उद्यां ये. आज आत्तां मी कपाळशूळानें बेजार आहे, जा."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चतुर वासिलिसा सावकारपुत्र इवानला भेटली व तिनें त्याला सांगितलें,

" माझ्या बापाच्या तीन मुली आहेत, म्हणजे आम्ही तीन बहिणी आहोंत. तुम्हांला त्यांच्यांतून एकीची निवड करावयाची आहे. पण त्यासाठीं राजा प्रथम आम्हां तिघींना सारख्या घोड्यांचं रूप धारण करायला लावील. त्यावेळीं तुम्ही नीट डोळे उघडे ठेवून पहा. माझ्या पाठीवर जो लगाम असेल त्यांतील एका कडीची चकाकी कमी होत राहील त्यावरून तुम्ही मला ओळखून अचूक माझी निवड करा. नंतर मग राजा आम्हां तिघींना बगळ्यांचं रूप देईल. आम्ही तिघी दाणे खात राहूं, पण मी मधूनमधून एका पंखाची उघडझाप करीन त्यावरून तुम्ही मला ओळखूं शकाल. नंतर मग राजा आम्हां तिघींना पुनः राजकन्या बनवील, पण त्यावेळीं आमचं रूप, उंची, केसांचा रंग, सगळं अगदीं एकसारखं राहील. पण त्यावेळीं मी माझ्या हातांतला हातरुमाल उडवीन त्यावरून तुम्ही अचूक माझी निवड करूं शकाल."

मग चतुर वासिलिसेनें सांगितल्याप्रमाणें राजानें तीन घोड्या उभ्यां करून इवानला त्यांतून एकीची निवड करण्यास सांगितलं.

सावकारपुत्र इवाननें तिन्ही घोड्यांना नीट निरखून पाहिलं व एका घोडीच्या लगामाच्या एका कडीची चकाकी कमी होत असल्याचं दिसतांच त्या घोडीची निवड करून राजाला सांगितलं, "मला हीच पसंत आहे."

"नाहीं, तूं चुकलास. पुनः विचार कर!" राजा म्हणाला,

"नाहीं, ही वधू चालेल मला!" इवान उत्तरला.

"छे! आतां पुनः निवड करावी लागेल तुला."

मग राजानें तीन बगळे इवानच्या समोर उभे केले व त्यांच्यापुढें दाणे टाकले. तिन्ही पक्षी दिसण्यांत अगदीं सारखे होते पण एकाच्या पंखाची उघडझाप सुरू होती ती पाहून इवाननें राजाला सांगितलं,

"हीच माझी वधू!"

"पुनः तूं चूक करतो आहेस!" राजा म्हणाला, "अजून विचार कर, नाहींतर पश्चात्ताप करावा लागेल."

मग राजानें इवानला पुनः निवड करण्यास सांगितलं. तीन सुंदर राजकन्या इवानच्या समोर उभ्या करण्यांत आल्या. तिघीजणी दिसायला अगदीं सारख्या! जणुं काय एकीच्याच प्रतिकृति!

पण त्या तिघींपैकीं एकजण हातरुमाल उडवीत होती, ती खूण ओळखून इवाननें तिचीच निवड केली.

इतकं झाल्यावर इलाज नव्हता. राजानें चतुर वासिलिसेचं इवानशीं लग्न लावून दिलं. लग्नसमारंभहि मोठ्या थाटामाटानें पार पडला.

कांही दिवस तिथें राहिल्यावर सावकारपुत्र इवाननें घरीं जाण्याचं ठरवलं व तो आपली पत्नी चतुर वासिलिसा हिच्यासह रातोरात त्या राजाच्या राज्यांतून बाहेर पडला. सकाळीं तीं दोघं निघून गेल्याचं समजतांच राजाला संताप आला व त्यानें आपलीं माणसं त्या दोघांचा पाठलाग करण्यास रवाना केलीं.

इवान व वासिलिसा घोड्यावरून जात असतां मध्येंच वासिलिसेनें घोडा थांबवून इवानला थांबवलं व ती त्याला म्हणाली, " जमिनीला कान लावून कांहीं ऐकायला येत का पहा बरं. "

इवाननें जमिनीला कान लावल्यावर सांगितलं, " मला घोड्यांच्या खिंचाळण्याचा आवाज ऐकूं येतोय. "

मग चतुर वासिलिसेनें इवानचं रूपांतर एका लहानशा फळबागेंत केलं व ती स्वतः त्या बागेंत एका कोबीचं रूप धारण करून बसली.

राजानें पाठवलेलीं माणसं खूप धांवपळ करून हात हालवीत परतलीं व त्यांनीं राजाला सांगितलं,

" आम्हांला रस्त्यांत कोणीच दिसलं नाहीं, सरकार ! फक्त एक फळबाग होती व तींत एक कोबी लागलेली होती. एवढंच दिसलं ! "

" जा ! ती कोबी घेऊन मजसमोर हजर करा ! ती त्या पोरटीचीच युक्ति आहे, जा ! "

त्या माणसांनीं पुनः लाठलाग सुरू केला. ते लोक जवळ येऊं लागतांच इवानला घोड्यांचा टापांचा आवाज ऐकूं आला व त्यानें वासिलिसेला सांगितलं.

चतुर वासिलिसेनं दुसरी युक्ति केली. ती स्वतः एक विहीर बनली व इवानचं रूपांतर तिनें एका ससाण्यांत केलं.

राजाचीं माणसं तिथें येऊन पोंचलीं तेव्हां त्यांना बाग व कोबी दिसेना. फक्त एका विहिरीच्या कांठाशीं एक ससाणा पाणी पीत असलेला तेवढा त्यांना आढळला. अन् पुढें रस्ताहि नव्हता हें पाहून तीं माणसं परत गेलीं व त्यांनीं राजाला जाऊन सागितलं,

" सरकार, ती बाग न् कोबी अदृश्य झाली ! त्या मैदानांत फक्त एक विहीर न् विहिरीच्या कांठावर एक तेजस्वी सणाणाच काय तो आढळला आम्हांला ! "

राजानें कन्येची ती युक्ति ओळखली व मग तो स्वतः पाठलागाला निघाला. राजाचा घोडा जवळ येतांच वासिलिसेनें तें ओळखून पुनः इवानला जमिनीला कान लावून ऐकण्यास सांगितलें. "यावेळीं मला फारच जोराचा आवाज व गडगडाट ऐकूं येतो आहे बघ!" तो म्हणाला.

वासिलिसा म्हणाली, "म्हणजे नक्की बाबा स्वतःच इकडे येताहेत. आतां यांतून सुटका कशी होणार हें मला तर सुचत नाहीं बाई."

"मलाहि कांहीं सुचत नाहीं बघ!" इवान म्हणाला.

चतुर वासिलिसेनें पुनः विचार केला. तिच्याजवळ तीन वस्तू होत्या. एक ब्रश, एक फणी व एक टॉवेल. त्या पाहून तिला कांहींतरी आठवलं व ती म्हणाली,

"ठीक! माझ्या पित्यापासून अजूनहि आपलं रक्षण करण्याची एक युक्ति आहे मजजवळ."

मग वासिलिसेनें तो ब्रश उलटा फिरवतांच तिथें एक अतिप्रचंड जंगल निर्माण झालं. त्या जंगलांत इतकी झाडी होती कीं आंत माणूसच काय पण नुसत्या हाताचा देखील शिरकाव होणं शक्य नव्हतं. अन् तें जंगल इतकं मोठं होतं कीं त्याला एक वळसा घालायचा म्हटलं तरी कमींत कमी तीन वर्षं लागलीं असतीं.

वासिलिसेचा बाप तिथवर येऊन पोंचल्यावर त्यानें खूप धडपड करून तें जंगल तोडून आंत जाण्यासाठीं वाट करून घेतली व मग त्यानें पुनः इवान-वासिलिसेचा पाठलाग सुरू केला. राजा त्या उभयतांच्या अगदीं जवळ येऊन ठेपला व जेमतेम एका हाताचं अंतर राहिलं होतं तोंच वासिलिसेनं हातांतली फणी उलटी फिरवली. अन् काय चमत्कार! तिथें एक इतका प्रचंड पर्वत निर्माण झाला कीं त्याला वळसा घालून जाण्याची किंवा वर चढण्याची सोय नव्हती.

मग राजानें तो पर्वत खोदण्याला सुरुवात केली. बराच काळ खोदल्यावर एक बोगदा तयार झाला व राजानें तो बोगदा पार करून पुनः इवान-वासिलिसेचा पाठलाग सुरू केला.

मग राजा पुनः जवळ आल्याचं पहातांच वासिलिसेनं हातांतला टॉवेल मागें फिरवला व त्या जागीं एक विशाल समुद्र निर्माण केला. राजा त्या समुद्राच्या किनाऱ्यावर येऊन पोंचला व पुढें रस्ता नसल्यामुळें निराश होऊन माघारी गेला.

मग सावकारपुत्र इवान आपल्या चतुर पत्नीला घेऊन घराच्या दिशेनें निघाचा. घर जवळ येतांच इवान पत्नीला म्हणाला,

" मी जरा पुढें जाऊन तूं माझ्याबरोबर असल्याचं आईबाबांना सांगतों अं."

" ठीक आहे, जा !" चतुर वासिलिसा म्हणाली. " पण एक गोष्ट ध्यानांत ठेवा. घरीं गेल्यावर तुम्हीं सर्वांचं चुंबन घ्याल तें घ्या, पण तुमची मानलेली धर्ममाता आहे तिला मात्र तुमचा मुका देऊं नका, कारण तसं केलंत तर तुम्हांला माझा पार विसर पडेल."

मग इवान घरीं गेला. पण तिथें सर्वांच्या भेटीनें त्याला इतका आनंद झाला कीं त्या भरांत त्याला पत्नीनें दिलेल्या इशाऱ्याचा विसर पडून त्यानें धर्ममातेसहित सर्वांना मुके घेऊं दिले. अन् त्याचा परिणाम असा झाला कीं त्याला वासिलिसेचा पार विसर पडला.

इकडे वासिलिसा बिचारी पतीची वाट पहात रस्त्यावरच उभी राहिली होती. दिवसामागून दिवस गेले तरी इवान परत आला नाहीं अखेर ती शहरांत गेली व एका म्हातारीच्या घरीं कामाला राहिली.

तिकडे सावकारपुत्र इवान वासिलिसेला पार विसरलाच होता. त्यानें लग्न करण्याचा विचार केला व एक सुंदर मुलगी निवडून लग्नाची तयारी सुरूहि केली.

चतुर वासिलिसेला ही बातमी समजतांच तिनें एका भिकारणीचा वेष केला व ती सावकाराच्या दाराशीं जाऊन भीक मागूं लागली.

इवानची आई बाहेर आली व भिकारणीला म्हणाली, " बाई, थांब ! मी तुझ्यासाठीं एक लहानशी केक भाजून आणते. लग्नासाठीं केलेली खास केक मी तोडणार नाहीं."

" जशी तुमची मर्जी !" भिकारीण म्हणाली.

पण झालं काय कीं इवानची आई स्वयंपाकघरांत जाऊन चुलीजवळ बसली तर लग्नासाठीं केलेली खास केक पार जळून गेली व भिकारणीसाठीं केलेली लहान केक मात्र उत्तम तयार झाली. इवानच्या आईनें जळून गेलेली केक भिकारणीला दिली व लहान केकच लग्नसमारंभाच्या मेजवानीसाठीं वाढली. पण मेजवानीच्या आरंभीं ती केक कापतांच तिच्यांतून दोन सुंदर पक्षी बाहेर पडले व त्यांतला नर मादीला म्हणाला,

" लाडके, तूं माझी ना ! मग मला एक चुंबन दे कीं ! "

" नको रे बाबा ! " मादी म्हणाली. " सावकारपुत्र इवान चतुर वासिलिसेला विसरला तसाच तूं मला विसरशील ! "

त्या नरमादीचा तसाच संवाद आणखी दोनदां झाला. तो ऐकून इवानला वासिलिसेचं स्मरण झालं व ती भिकारीण म्हणजेच वासिलिसा हेंहि त्यानें ओळखलं. मग त्यानें आईबापांना सांगितलं, " हीच माझी पत्नी चतुर वासिलिसा. "

" असं का ! अरे वा ! " इवानचे आईबाप म्हणाले. " तुझं आधींच लग्न झालेलं आहे तर तूं या पत्नीशींच संसार कर. "

मग इवाननें जी दुसरी मुलगी वधू म्हणून आणली होती तिला इवानच्या आईबापांनीं खूप जवाजवाहिर वगैरे भेटी देऊन तिच्या आईवडिलांकडे पाठवलं व मग सावकारपुत्र इवान चतुर वासिलिसेसह सुखानें संसार करूं लागला. त्या उभयतांना मग खूप वैभव प्राप्त झालं व त्यांचे दिवस आनंदांत निघून गेले.





# ३. हिमदेवाची कहाणी

एक म्हातारा होता. त्याची दुसरेपणाची बायको होती. त्याला पहिल्या बायकोची एक मुलगी होती आणि या दुसऱ्या बायकोलाहि पहिल्या लग्नापासून झालेली एक मुलगी होती.

सावत्र आईचा जाच कसा असतो हें तर सर्वांना ठाऊकच आहे. कांहीं चुकलं म्हणजे तर मार मिळायचाच, पण कामांत कांहीं चुकलं नाहीं तरी मार कांहीं चुकायचा नाहीं. याउलट त्या सावत्र आईच्या पोटच्या पोरीचे मात्र सगळे लाड न् कौतुक सुरू असायचं. तिनें कांहींहि केलं तरी 'माझी गुणाची बाळ ती!' म्हणून तिला शाबासकी मिळायची.

म्हाताऱ्याची पहिल्या बायकोची मुलगी बिचारी भल्या पहांटे उठून गुराढोरांचं करी, सर्पण गोळा करून आणी, पाणी भरून ठेवी, चूल पेटवी, केर काढी, सगळं काम करीत सतत राबत राही. तरीसुद्धां सावत्र आई सारखी हेंच केलं नाहीं, तेंच राहिलं, असं करून तिच्यावर धुसपुसत अन् ओरडत असायची.

वाऱ्याचं तरी असं असतं कीं कांहीं वेळ सोसाट्याचा वारा सुटला कीं मग त्याचा जोर संपून तो शांत होतो. पण बायांचं तसं नसतं. त्यांच्या अंगांत वारं संचारलं कीं त्या शांत होण्याऐवजीं

अधिकच खवळून उठतात. या सावत्र आईचं तसंच होतं. तिचा आपल्या सावत्र मुलीबद्दलचा द्वेष सारखा वाढतच होता. इतका कीं तिनें तिचा कायमचाच कांटा काढायचं ठरवलं आणि मग ती नवऱ्याला म्हणाली :

"हें पहा हो ! ही कार्टी मला डोळ्यांसमोर सुद्धां नको ! भर थंडींत बर्फ पडत असेल-अशा वेळीं तिला जंगलांत नेऊन तिथेंच सोडून परत या कसे !"

म्हाताऱ्याला फार वाईट वाटलं. तो खूप रडला सुद्धां. पण दुसरेपणाच्या बायकोपुढें म्हाताऱ्या नवऱ्यांचं कधींच चालत नाहीं. बायको म्हणेल तें प्रमाण !

म्हाताऱ्यानें खूप सांगून पाहिलं, पण बाई ऐकेचना. अखेर त्यानें निरूपायानें बर्फांतून न्यायच्या गाडीला घोडा जोडला व मुलीला हांक मारून म्हटलं,

"पोरी, चल बाई. बैस गाडींत !"

मग त्या आईविना पोरक्या झालेल्या पोरीला तो गाडींत घालून जंगलांत घेऊन गेला व तिथें एक फरवृक्षाच्या खालीं बर्फाच्या ढिगावर तिला सोडून तो गाडी घेऊन घरीं परतला.

त्यावेळीं थंडी मी म्हणत होती अन् पोरगी विचारी हिंव भरून आल्यासारखी कांपत होती.

अचानक तिला हिमदेवाची चाहूल लागली. एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारीत हिमदेव ती ज्या झाडाखालीं बसली होती तिकडेच येत होते. त्यांच्या उड्या मारण्यानें झाडांच्या फांद्यांचा काड्काड् आवाज येत होता.

हिमदेव अगदीं तिच्या डोक्यावरच्या फांदीवर येऊन उभे राहिले अन् त्यांनीं विचारलं :

"तुला थंडी तर वाजत नाहीं ना, पोरी ?"

"नाहीं हिमदेव, मला चांगली ऊब आलेली आहे !" ती मुलगी म्हणाली. आपलं दुःख हिमदेवापुढें प्रकट करणं तिला बरं वाटलं नाहीं.

हिमदेव आणखी खालीं आले व जोरानें काड्काड् आवाज करून त्यांनीं पुनः विचारलं,

"तुला खरंच थंडी वाजत नाहीं, पोरी ?"

मुलगी थंडीनें इतकी गारठली होती कीं तिला श्वासोच्छ्वास करणं सुद्धां मुष्किल झालं होतं. तरी सुद्धां ती म्हणाली :

" नाहीं, हिमदेव. मुळींच थंडी वाजत नाहीं मला ! "

हिमदेव आणखी खूपच खालीं आले व भयंकर जोरानें काड्काड् धाड्धाड् असा आवाज करीत म्हणाले :

" मुली, तुला थंडी वाजत नाहीं का ? ए पोरी, खरंच वाजत नाहीं तुला थंडी ? "

मुलीचं सारं अंग थंडीनें असं गारठून सुन्न पडलं होतं कीं तिची जीभ वळणं सुद्धां कठीण झालं होतं. तरीसुद्धां तिनं हिमदेवाला सांगितलं :

" खरंच हिमदेव ! मुळींच थंडी वाजत नाहीं हो मला ! "

हिमदेवाला त्या मुलीची फार दया आली व त्यांनीं आपल्या उबदार लोकरीच्या व परांच्या दुलईत तिला लपेटून घेतलं.

तिकडे त्या मुलीच्या घरीं मात्र निराळाच प्रकार सुरू होता. सावत्र आई असं धरून चालली होती कीं कारटी गारठून मेलीच असणार ! म्हणून त्या बयेला फार आनंद झाला होता व तिनें मोठ्या उत्साहानें गोडधोडाचं जेवण केलं होतं. पानगे वगैरे करण्याची सगळी तयारी झाल्यावर ती नवऱ्याला म्हणाली :

" अहो, ऐतोबा ! जंगलांत जा अन् त्या कार्टीचं प्रेत घेऊन या म्हणजे पुरून तरी टाकूं आपण ! "

म्हातारा निमूटपणें उठला व जंगलांत गेला. त्यानें मुलीला ज्या ठिकाणीं सोडून दिलं होतं तिथेंच जाऊन पाहतो तों काय ! मुलगी तिथें बसलेली ! तीसुद्धां अगदीं आनंदांत अन् ताजी टवटवीत ! गरम लोकरीचा कोट तिच्या अंगाभोंवतीं लपेटलेला होता व भरजरी कपडे तिच्या अंगावर होते. शिवाय बाजूला एक भलंमोठं कपाट होतं तें खूप बहुमोल वस्तूंनीं भरलेलं होतं. त्या सगळ्या वस्तु हिमदेवांनीं त्या मुलीला भेट म्हणून दिलेल्या होत्या.

तें दृश्य पाहून म्हाताऱ्याला खूप आनंद झाला. त्यानें पोरीला बर्फांतून चालणाऱ्या गाडींत बसवलं, बाजूला कपाटहि ठेवलं अन् गाडी घराच्या दिशेनें वळवली.

घरीं ती सावत्र आई पानगे करीत बसली होती तोंच अचानक तिला कुणाचं तरी गाणं ऐकूं आलं. बाई पाहाते तों काय! घरचा कुत्रा मोत्याच टेवलाखालीं बसून गाणं म्हणत होता.

"भो! भो! म्हाताऱ्याची पोरगी आली नवरी सजून,
म्हातारीची पोर राहाणार लग्नावांचून!"

तें गाणं ऐकून बाईला राग आला. तिनें हातांतला पानगा कुत्र्याकडे फेकला व ती त्याला म्हणाली :

"तुझं गाणं चुकीचं आहे मोत्या! तूं असं म्हण कीं—

"म्हातारीची पोर आली नवरी सजून,
म्हाताऱ्याची पोरगी तर गेली मरून!"

पण मोत्या कांहीं ऐकेना. त्याचं आपलं तेंच! त्यानें पानगा खाऊन टाकला पण तो पुनः तेंच गाणं म्हणूं लागला.

बाईनें आणखी पानगे मोत्याकडे फेकले व त्याला मारलं सुद्धां, पण त्याचं आपलं तेंच पालुपद कायम!

हा प्रकार सुरू होता तोंच कर्र फाटक वाजलं, मग दार उघडलं अन् त्या बयेच्या डोळ्यांत सलणारी तिची सावत्र मुलगी आंत आली. तिच्या अंगावरचे भरजरी कपडे लखलख चकाकत होते. तिच्या मागोमाग तिचा बाप तें बहुमोल वस्तूंनीं भरलेलं कपाट घेऊन येत होता.

सावत्र आई डोळे फाडून आश्चर्यानं सावत्र मुलीकडे पाहूं लागली.

मग तिनें नवऱ्याला फर्मान सोडलं,

"अहो ऐतोबा! पाहातां काय? आत्तांच्या आत्तां गाडी जोडा अन् या माझ्या सख्ख्या लेकीला जंगलांत घेऊन जाऊन या कार्टीला सोडलं होतं त्याच जागीं सोडून या."

म्हाताऱ्यानें गाडी जोडली, बायकोच्या लाडक्या लेकीला गाडींत बसवलं अन् जंगलांत नेऊन त्याच फरवृक्षाच्या खालीं बर्फावर तिला सोडलं व तो गाडी घेऊन घरीं परतला.

ती पोरगी थंडीनें कांपूं लागली. तिचे दांत सुद्धां कराकरा वाजूं लागले.

कांहीं वेळानें हिमदेवाची स्वारी या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत तिकडे आली. त्यांच्या उड्या मारण्यानें झाडांच्या फाद्यांचा काड्काड् आवाज येत होता व हिमदेव मधूनमधून थांबून त्या पोरीकडे पहात होते. मग हिमदेवांनीं विचारलं.

"तुला थंडी तर वाजत नाहीं ना, मुली?"

मुलगी म्हणाली, "नाहीं हो! वाजते आहे कीं, फार फार थंडी वाजतेय मला. अन् तूं असा काड्काड् अन् धाड्धाड् आवाज करूं नकोस, हिमा!"

हिमदेव आणखी खालीं आले व जोरानें काड्काड् न् धाड्धाड् आवाज करीत म्हणाले :

"पोरी! थंडी तर वाजत नाहीं ना तुला? खरंच नाहीं ना वाजत थंडी, बाळ?"

"वा रे वा! सारं अंग कसं गारठून गेलंय माझं. तूं चालता हो कसा इथून, हिमा!"

तरीसुद्धां हिमदेव आणखी खालीं आले. त्यांनीं आणखी जोरानें काड्काड् धाड्धाड् आवाज केला. त्यांच्या श्वासांतहि कमालीचा गारठा आला. त्यांनीं मुलीला विचारलं :

"तुला थंडी तर वाजत नाहीं ना मुली? खरंच ठीक आहेस ना, बाळ?"

"ए! मी नुसती गारठून गेलें आहे कीं! तुझं तळपट होवो दुष्टा! नीचा!"

तिच्या या शब्दांनीं हिमदेवांचा संताप अनावर झाला व त्यांनीं दोन्ही हातांनीं तिला पकडलं व त्या कचाट्यांत थंडी असह्य होऊन ती पोरगी इतकी गार पडली कीं तिचा प्राणच निघून गेला.

इकडे दिवस उजाडतां उजाडतांच त्या पोरीच्या आईनें नवऱ्याला हुकूम सोडला :

"अहो ऐतोबा, उठा! लवकर गाडी जोडा अन् माझ्या लाडकीला कुठें सोडलंय तिथून घेऊन या बरं! अन् तिच्या अंगावर भरजरी कपडे घालून आणा बरं का!"

बिचारा म्हातारा! बायकोच्या आज्ञेप्रमाणें तो गाडी जोडून निघाला. त्याची गाडी गेल्यावर मेजाखालीं बसलेला मोत्या कुत्रा गाणं म्हणूं लागला :

"भो! भो! म्हाताऱ्याच्या पोरीचं लगीन होईल,
म्हातारीची पोर तर गारठून जाईल!"

म्हातारीनें एक पानगा मोत्याच्या अंगावर फेकला व ती त्याला म्हणाली :

"ए, मोत्या! असलं चुकीचं गाणं नाहीं म्हणायचं! काय म्हणायचं तें मी सांगतें. असं म्हण कीं—


"म्हातारीची पोर आली नवरी सजून,
म्हाताऱ्याची पोर राहील लग्नावांचून!"


पण मोत्या कांहीं ऐकेना. त्याचं आपलं तेंच पालुपद कायम! तो म्हणतच राहिला :

"भो! भो! म्हातारीची पोर तर गारठून जाईल!"

तेवढ्यांत बाहेर फाटकाचा कर्र आवाज झाला अन् म्हातारी आपल्या पोरीला भेटायला म्हणून धांवतच बाहेर निघाली. पण तिनें गाडीचं दार उघडलं तो काय! थंडीनें गारठून मरून गेलेल्या मुलीचं लाकडासारखं ताठ झालेलं शरीरच तिच्या दृष्टीस पडलं.

म्हातारीनें तें दृश्य पाहून दुःखानें हंबरडा फोडला. पण आतां काय उपयोग! जें व्हायचं तें होऊन गेलं होतं! तिच्याच करणीचं फळ ती भोगत होती!





# ४. तेजस्वी ससाणा फेनिस्ट

एकदां एक शेतकरी होता. त्याची बायको मरून गेली होती व तिच्यामागें तीन मुलींचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्या म्हाताऱ्या शेतकऱ्यावर येऊन पडली होती. त्यानें असा विचार केला कीं घराच्या कामांत मदत म्हणून एखादी बाई नोकरीला ठेवावी. पण सगळ्यांत धाकटी मुलगी मार्यूश्का म्हणाली,

"बाबा, नोकराची कांहीं जरूर नाहीं. मी पाहीन घरच्या सगळ्या कामाचं."

म्हणून मग मार्यूश्काच सगळं घरचं काम पाहूं लागली व लवकरच ती त्या कामांत तरबेज झाली. कुठलंहि काम असो, ती तें व्यवस्थितपणें पार पाडी. साहाजिकच बापाची ती फार आवडती झाली व आपल्याला अशी हुशार व कष्टाळू कन्या लाभल्याबद्दल म्हाताऱ्याला तिचा फार अभिमान वाटूं लागला.

शिवाय मार्यूश्का दिसायलाहि फार देखणी होती. याउलट तिच्या दोन्ही वडील बहिणी दिसायला कुरूप होत्या, पण त्यांचा सदा नट्टापट्टा व नवेनवे कपडे असे प्रकार सुरू असायचे. त्या दोघी स्वभावानंहि अत्यंत लोभी व मत्सरी होत्या. सारा दिवस त्यांचा कपडे बदलण्यांत

व सुंदर दिसण्यासाठीं चेहऱ्याची रंगरंगोटी करण्यांत जायचा. अन् कितीहि भारी कपडे असले तरी फार दिवस त्यांना ते चालत नसत. झगे, शाली, उंच टाचेचे बूट, त्या सारखे बदलत राहायच्या.

एक दिवस म्हातारा बाजारांत जायला निघाला तेव्हां त्यानें मुलींना विचारलं, "मुलींनो, तुमच्यासाठीं मी येतांना काय आणूं? तुम्हांला कोणत्या वस्तू आवडतात?"

दोन्ही मोठ्या बहिणी म्हणाल्या, "आमच्यासाठीं एकेक रेशमी रुमाल आणा. मात्र त्यावर सोन्यारी फुलं काढलेलीं असतील असे रुमाल हवेत."

धाकटी मार्यूश्का कांहींच बोलली नाहीं म्हणून बापानें तिला विचारलं, "तुला काय आवडतं, मार्यूश्का?"

मग मार्यूश्का म्हणाली, "बाबा, आणणारच असाल तर फेनिस्ट नांवाचा खूप तेजस्वी ससाणा आहे त्याचं एक पीस घेऊन या."

म्हातारा परत आला तेव्हां त्यानें दोन रेशमी रुमाल आणले होते, पण मार्यूश्कानें मागितलेलं पीस कांहीं त्याला मिळालं नव्हतं.

कांहीं दिवसांनीं म्हातारा पुनः बाजाराला जाण्यास निघाला. तेव्हां त्यानें मुलींना त्यांच्या आवडत्या वस्तूंबद्दल विचारलं.

दोन वडील मुलींनीं आग्रहानें सांगितलं, "आम्हां दोघींसाठीं चांदीचं नक्षीकाम केलेले बूट आणा."

धाकट्या मार्यूश्कानें मात्र पुनः तेंच सांगितलं, "फेनिस्ट नांवाच्या तेजस्वी ससाण्याचं पीस तेवढं आणा माझ्यासाठीं."

त्या दिवशींहि म्हातारा बुटाच्या जोड्या घेऊन आला, पण सबंध बाजारांत तें पीस कांहीं कुठें मिळालं नाहीं.

तिसऱ्यांदा पुनः तो बाजाराला निघाला तेव्हां मोठ्या बहिणींनीं नवे झगे आणायला सांगितले व मार्यूश्कानें पुनः त्या पिसाचीच मागणी केली.

त्या दिवशींहि सबंध बाजार हिंडून तें पीस कांहीं मिळालं नाहीं तें नाहींच. मग म्हातारा गाडींतून घरीं परत येण्यास निघाला. शहराची हद्द ओलांडून गाडी बाहेर आली तोंच एक बुटका म्हातारा चालला होता. मार्यूश्काच्या बापानें त्याला हटकलं व म्हटलं,

" नमस्कार, आजोबा ! "

" नमस्ते ! कुठं निघालांत ? "

" गांवाला परत चाललोंय, आजोबा. पण एक मोठी पंचाईत आलीय. म्हणजे असं कीं माझ्या धाकट्या मुलीनं मला फेनिस्ट नांवाच्या तेजस्वी ससाण्याचं पीस आणायला सांगितलं होतं, पण बाजारांत कुठेंच तें पीस मिळत नाहीं. "

" अस्सं होय ! " बुटका म्हातारा उद्गारला. " तसलं एक पीस मजजवळ आहे. मात्र तें जादूचं आहे बरं का. पण तुम्ही चांगले सज्जन दिसतां तेव्हां काय होईल तें होवो मी तुम्हांला तें पीस देतों. "

त्या म्हाताऱ्यानें तें पीस काढून मार्यूश्काच्या बापाला दिलं. तें पीस अगदीं साधंच होतं हें पाहून मार्यूश्काचा बाप स्वतःशींच उद्गारला, " माझ्या पोरीला याचा काय उपयोग होणार ! " म्हातारा घरीं परत आल्यावर त्यानें तिन्हीं मुलींना त्यांच्यासाठीं आणलेल्या वस्तू देऊन टाकल्या. दोन्ही मोठ्या बहिणींनीं आपले नवे झगे घालून पाहिले व त्या मार्यूश्कासाठीं आणलेलं पीस पाहून तिची थट्टा करूं लागल्या.

" खुळी रे खुळी ! आतां घाल तें पीस तुझ्या वेणींत ! काय पण ध्यान दिसेल नाहीं ! "

यावर मार्यूश्का कांहींच बोलली नाहीं. ती आपली एकटी काम करीत राहिली. मग रात्रीं सगळेजण झोपल्यावर तिनें तें पीस खालीं जमिनीवर ठेवलं व ती हलक्या आवाजांत म्हणाली,

" हे तेजस्वी ससाण्या फेनिस्ट ! माझ्या आवडत्या प्रियकरा ! माझ्या भावी पतिराजा ! ये ! "

आणि काय चमत्कार ! त्या पिसांतून एक अत्यंत सुंदर व तेजस्वी असा तरुण मार्यूश्कासमोर उभा राहिला. रात्र संपून पहांट होतांच त्या तरुणानें जमिनीवर पाय आपटतांच त्याचं एका ससाण्यांत रूपांतर झालं. मार्यूश्कानें खिडकी उघडतांच तो ससाणा नील आकाशांत उडून गेला.

अशा प्रकारें लागोपाठ तीन रात्रीं तो ससाणा तेजस्वी तरुण बनून मार्यूश्काच्या भेटीला आला. दिवस होतांच तो ससाणा बनून आकाशांत उडून जाई व मध्यरात्रींच्या वेळीं सुंदर तरुणाचं रूप धारण करून मार्यूश्काला भेटायला येई.

चौथ्या रात्रीं मात्र मार्यूश्काच्या दोन्ही दुष्ट बहिणींनीं हा प्रकार पाहिला व लगेच वडिलांकडे चहाडी केली. पण बाप त्यांना म्हणाला, "बरं, बरं! तुम्हांला काय करायचं त्याच्याशीं? तुम्ही आपल्यापुरतं पहा!"

पण त्या मुली कसल्या दुष्ट! त्या स्वतःशीं म्हणाल्या, "ठीक आहे. आम्हीच पहातों हें कसं चालतं तें!"

मग त्या दोघींनीं रात्रीं तो ससाणा आंत येत असे त्या खिडकीच्या चौकटींत अणकुचीदार सुऱ्या खोचून ठेवल्या व काय होतें तें पहाण्यासाठीं त्या लपून बसल्या.

मध्यरात्रीच्या वेळीं तो ससाणा उडत उडत खिडकीशीं आला. पण त्या सुऱ्या अडकवलेल्या असल्यामुळें तो आंत येऊं शकला नाहीं. त्यानें बराच वेळ पंख फडकवले व खिडकीवर धडक मारली. अखेर त्याची छाती रक्तबंबाळ झाली, पण बिचाऱ्या मार्यूश्काची झोंप कांहीं उघडली नाहीं.

मग तो ससाणा परत फिरला व जातां जातां म्हणाला, "ठीक आहे, मी जातों आतां. ज्या कुणाला माझी गरज असेल त्याला माझी प्राप्ति होईल, पण त्यासाठीं त्रास सहन करावा लागेल. लोखंडी बुटाच्या तीन जोड्या झिजव, तीन लोखंडी दांडे तोड व तीन लोखंडी टोप्या घालून फाड, तेव्हां मगच माझी प्राप्ति होईल."

मार्यूश्कानें हें भाषण ऐकून ती जागी झाली व ती धांवतच खिडकीपाशीं पोंचली. पण काय! ससाणा निघून गेला होता व खिडकीच्या चौकटीवर त्याचं लाल रक्त तेवढं शिल्लक होतं. मार्यूश्काला रडूं कोसळलं व तिच्या अश्रूंनीं ते रक्ताचे डाग धुऊन निघाले आणि मार्यूश्का मात्र अधिकच सुंदर दिसूं लागली.

मग ती पित्याकडे जाऊन म्हणाली,

"माझ्यावर रागावूं नका, बाबा. पण मला खडतर मार्गानें जावं लागणार आहे, तिकडे जाण्याची परवानगी द्या. जगलेवांचले तर भेटेनच तुम्हांला, नाहींतर हीच आपली अखेरची भेट समजा."

आपली लाडकी कन्या जायला निघालेली पाहून बापाला अर्थातच फार दुःख झालं, पण अखेर त्यानें तिला जाण्याला संमति दिली.

मार्यूश्का घरांतून बाहेर पडल्यावर प्रथम तिनें लोहाराकडून तीन लोखंडी बुटांचे जोड, तीन लोखंडी दांडे व तीन लोखंडी टोप्या करवून

घेतल्या. तेवढं होतांच ती आपल्या प्रिय पतीच्या—फेनिस्ट नांवाच्या तेजस्वी ससाण्याच्या—शोधार्थ निघाली. अनेक खुलीं मैदानं, घनदाट जंगलं, उंच डोंगर तिनें ओलांडले. तिच्या या एकाकी प्रवासांत चिमुकले पक्षी मंजुळ कूजन करून तिला धीर देत, झुळझुळ वाहणारे पाण्याचे झरे तिचा चेहरा धुवून काढीत व दाट जंगलं तिचं प्रेमानें स्वागत करीत. कोणीच मार्यूश्काला त्रास देऊं शकत नव्हतं. कारण लांडगे, अस्वलं, कोल्हे, सगळेच तिच्याजवळ धांवून तिचं रक्षण करण्याला सज्ज असत.

अशा प्रकारें खूप प्रवास झाल्यावर एक लोखंडी बुटाचा जोड झिजला, एक लोखंडी काठी तुटली व एक लोखंडी टोपी फाटून गेली.

इतकं झाल्यावर मार्यूश्का जंगलांतल्या एका खुल्या जागेवर येऊन पोंचली. त्या ठिकाणीं कोंबडीच्या पायावर एक लहान झोपडी होती व ती गरगरा फिरत होती.

मार्यूश्का त्या झोपडीला म्हणाली, "झोपडी, झोपडी! तुझा पुढचा भाग माझ्याकडे अन् मागचा भाग झाडांकडे कर. मला आंत येऊन भाकरी खायची आहे."

झोपडीनें तसं केलं व मार्यूश्का आंत शिरली. आंत बाबायागा नांवाची चेटकीण बसलेली होती. तिच्या एका हातांत एक केरसुनी व दुसऱ्या हातांत एक झाडाच्या फांदीची लवचिक काठी होती. ती चेटकीण नुसत्या हाडाच्या सापळ्यासारखी दिसत होती व तिचं नाक भलंमोठं होतं.

बाबायागा मार्यूश्काला पाहून खेकसली, "हूं! कोणीतरी रशियन प्राणी दिसतो आहे, होय ना? आजवर कधीं तुला पाहिलेलं नाहीं मी. पण रक्ताचा वास येतोय मला. कोण तूं? कोठून आलीस? अन् कुठें निघालीस?"

"मी किनई आजी फेनिस्ट नांवाचा तेजस्वी ससाणा आहे ना त्याला शोधायला निघालेंय."

"अस्सं! मग तुला अजून खूप दूर जावं लागेल, पोरी! साता-समुद्रापलीकडे एक मोठं राज्य आहे. तिथपर्यंत जावं लागेल तुला. तिथली राणी एक दुष्ट चेटकीण आहे. तिनं त्याला मंतरलेलं पाणी पाजून स्वतःशीं लग्न करायला भाग पाडलेलं आहे. पण मी तुला मदत करीन हो बाळ. मी तुला ही चांदीची ताटली अन् सोन्याचं अंडं देतें.

तें घे. तूं त्या राणीच्या राज्यांत पोंचलीस म्हणजे तिच्याचकडे नोकर म्हणून कामाला राहा. दिवसभराचं काम झालं म्हणजे ही चांदीची ताटली काढ अन् हें सोन्याचं अंडं तिच्यांत ठेव. तें अंडं आपोआप गरगरा फिरूं लागेल. तिथले लोक तें विकत मागतील. पण तूं तें विकूं नकोस. तूं त्यांना सांग, म्हणावं मला फक्त फेनिस्ट नांवाचा तेजस्वी ससाणा दाखवा."

मार्यूश्कानें बाबायागाचे आभार मानले व ती पुढें निघाली. पुढचा मार्ग अधिकच बिकट होता. तिला जंगल लागलं तें पूर्वीच्या जंगलापेक्षांहि घनदाट होतं. मार्यूश्का भयभीत होऊन उभी राहिली. तेवढ्यांत एक मांजर तिच्यासमोर आली व तिला म्हणाली,

"भिऊं नकोस, मार्यूश्का. यापुढचा मार्ग बिकटच आहे, पण तूं न भितां पुढें चालत राहा. फक्त मागें वळून पाहूं नकोस म्हणजे झालं."

एवढं बोलून मांजरीनें मार्यूश्काच्या पायावर अंग घासलं व ती निघून गेली. मार्यूश्का पुढें निघाली. ती जसजशी पुढें गेली तसतसं जंगल अधिकच दाट होत होतं व समोर मार्ग दिसत नव्हता. पण ती चालत राहिली. अखेर तिच्या लोखंडी बुटांचा दुसरा जोड व काठी तुटली व दुसरी लोखंडी टोपी फाटून गेली. मग लवकरच ती अशा जागीं आली कीं तिथें कोंबडीच्या पायांवर एक झोपडी होती. त्या झोपडीभोंवतीं भलंमोठं काटेरी कुंपण होतं व खांबांवर माणसांच्या डोक्यांच्या चकाकणाऱ्या कवट्या उभ्या केलेल्या होत्या.

मार्यूश्का म्हणाली, "झोपडी, झोपडी! तुझी पाठ झाडाकडे अन् तोंड माझ्याकडे कर पाहूं. मला आंत येऊन भाकरी खायचीय."

झोपडीनें तसं करून दार समोर येतांच मार्यूश्का आंत शिरली. आंत बाबायागा नांवाची चेटकीण होती. तिच्या एका हातांत केरसुनी व दुसऱ्या हातांत झाडाच्या लवचिक फांदीची काठी होती. तिचं शरीर अस्थिपंजर झालेलं व नाक भलंमोठं न अणकुचीदार होतं.

बाबायागानें मार्यूश्काला पाहिलं व ती गुरगुरली :

"कोणीतरी रशियन रक्ताचा प्राणी दिसतोय! मी पाहिलेलं नाहीं कधीं तुला. पण रक्ताचा वास कळतो मला. कोण ग तूं? कुठून आलीस? अन् कुठें निघालीस?"

"फेनिस्ट नांवाच्या तेजस्वी ससाण्याच्या शोधांत आहे मी."

" अन् तूं माझ्या बहिणीला भेटून आलीस ? "

" होय, आजी, तिकडूनच आलें मी. "

" बरं तर, पोरी ! तूं मोठी गोड दिसतेस. मी करीन हं तुला मदत. ही सोन्याची सुई अन् चांदीची चौकट घे. ही सुई आपोआप जीगचं भरतकाम करील अन् त्या चौकटींत लाल मखमलीवर सोन्यारुप्याचं जीगचं काम निघेल. पण ही सुई न् चौकट कुणी विकत मागितली तर देऊं नकोस बरं का तूं. एवढंच सांग, म्हणावं मला फेनिस्ट दाखवा. "

मार्यूश्कानें बाबायागाचे आभार मानले व ती पुढें निघाली. ती चालूं लागली तेव्हां भयंकर आवाज झाले, विजांचा गडगडाट ऐकूं येऊं लागला, जंगलांत सूंऽऽ आवाज सुरू झाला व झोपडीच्या भोंवतालीं सर्वत्र लटकणाऱ्या कवट्यांतून विचित्र प्रकाशाचे किरण बाहेर पडूं लागले. भयानकच प्रकार होता तो !

पण मार्यूश्का भीतीनें गर्भगळित होण्यापूर्वींच एक कुत्रा धांवत आला व तिला म्हणाला,

" भो भो ! मार्यूश्का ! भिऊं नकोस मुली. पुढें याहूनहि विकट प्रसंग येईल पण तूं मागें वळून न पाहातां सरळ चालत राहा म्हणजे कांहीं होणार नाहीं. "

कुत्रा एवढं बोलून निघून गेला. मार्यूश्का वाट चालूं लागली. ती खूप खूप चालली अन् जंगल अधिकाधिक दाट होत गेलं तसं अगदींच कांहीं दिसेनासं झालं. मार्यूश्का सारखे पाय खाजवीत होती व स्वतःच्याच बाह्या धरीत होती, पण तरीसुद्धां ती मागें वळून न पाहतां सारखी चालत होती.

अखेरीस तिचं इतकं चालणं झालं कीं तिचा तिसरा लोखंडी बुटांचा जोड झिजून गेला, तिसरी लोखंडी काठी तुटून गेली व तिसरी लोखंडी टोपी फाटून गेली. अन् मग ती जंगलांतल्या खुल्या मैदानांत येऊन पोंचली. तिथें एका कोंबडीच्या पायावर एक झोपडी होती व चहूंबाजूला मोठमोठ्या खांबाच्या टोंकांवर घोड्यांची मुंडकीं लटकवलेलीं होतीं.

मार्यूश्का झोपडीला उद्देशून म्हणाली, " झोपडी, झोपडी ! तुझी मागची बाजू जंगलाकडे व दार माझ्याकडे कर ना गडे. "

झोपडीनें तसं केल्यावर मार्यूश्का आंत गेली. आंत अस्थिपंजर शरीराची व भल्यामोठ्या नाकाची बाबायागा चेटकीण बसलेली होती. मार्यूश्काला पाहून ती उद्गारली :

"रशियन रक्ताचा वास येतोय मला ! मी तुला पाहिलेलं नाहीं कधीं, पण वास ओळखते मी. कोण तूं ? कुठून आलीस ? अन् निघालीस कुठें ?"

"फेनिस्ट ससाण्याच्या शोधांत निघाले आहे मी, आजी."

"त्याला शोधून काढणं सोपं काम नाहीं, पोरी. पण मी तुला मदत करीन बेटा. ही घे सोन्याची कांडी न् चांदीची चाती. ही चाती हातांत धरलीस कीं आपोआप ती सूत कातूं लागेल अन् तें सूत म्हणजे अस्सल सोन्याचे तंतू असतील, समजलीस !"

"फार उपकार आहेत तुमचे माझ्यावर, आजी."

"बरं बरं. उपकार बिपकार राहूं दे सध्यां. आधीं माझं ऐक. या दोन जिनसा कुणी विकत मागितल्या तर देऊं नकोस, म्हणावं, मला फक्त फेनिस्ट कोठें आहे तें दाखवा म्हणजे झालं."

मार्यूश्कानें पुनः एकदां बाबायागाचे आभार मानले व ती पुढें निघाली. जंगलांत सगळीकडून गुरगुरण्याचे, ओरडण्याचे व सोसाट्याच्या वाऱ्याचे आवाज ऐकूं येत होते. घुबडांचे धूत्कार सुरू होते व घुशी आपल्या बिळांतून बाहेर पडून मार्यूश्काकडेच धांवत येत होत्या. मार्यूश्का हे प्रकार पाहून भयचकित झाली तोंच एक लांडगा तिच्याकडे धांवत आला व तिला म्हणाला,

"भिऊं नकोस, मार्यूश्का. माझ्या पाठीवर बैस अन् मागें वळून पाहूं नकोस म्हणजे झालं."

मार्यूश्का पाठीवर स्वार होतांच लांडगा विजेच्या वेगानें धांवूं लागला. मोठमोठालीं मैदानें व मखमलीसारखीं कुरणं त्यानें ओलांडलीं, लोण्याचा किनारा असलेल्या दुधाच्या नद्या त्यांनीं पार केल्या, आणि गगनचुंबी पर्वतहि मागें टाकले. असा खूप खूप प्रवास केल्यावर मार्यूश्का एका राजवाड्यापाशीं येऊन पोंचली. तो महाल स्फटिकाचा बनवलेला होता, त्याच्या आवारांत उत्कृष्ट नक्षीकाम केलेलं होतं व खिडक्यांचीं तावदानं विलक्षण सुंदर अशा विविध रंगांच्या कांचांचीं होतीं. अन् त्या महालाशीं येऊन ठेपतांच तिथें राहाणारी राणी स्वतःच खिडकींत उभी असलेली मार्यूश्काला दिसली.

तिथें येऊन पोंचतांच लांडगा मार्यूश्काला म्हणाला, "आपण आपल्या इच्छित स्थळीं येऊन पोंचलों आहोंत, मार्यूश्का. आतां खालीं उतर अन् या महालांत जाऊन दासी म्हणून कामाला राहा."

मार्यूश्का आपलं सामान घेऊन लांडग्याच्या पाठीवरून खालीं उतरली व लांडग्याचे आभार मानून तिनें आंत महालांत प्रवेश केला तिथें राणीला लवून नमस्कार करून ती म्हणाली,

"असं एकदम आंत आल्याबद्दल मी माफी मागते, पण आपल्याला एखाद्या दासीची जरूर असेल ना ?"

"आहे खरी," राणी म्हणाली "मी पुष्कळ दिवसांपासून दासीच्या शोधांत आहे. पण मला दासी पाहिजे ती अशी हवी कीं तिला सूत कातता आलं पाहिजे, विणकाम आलं पाहिजे व भरतकामहि यायला हवं."

"हें सगळं काम करीन मी."

"मग आंत येऊन लाग कामाला."

मार्यूश्का दासी म्हणून कामाला लागली. सारा दिवस तिनें काम केलं व मग संध्याकाळ झाल्यावर तिनें चांदीची ताटली व सोन्याचं अंडं बाहेर काढलं. तें अंडं ताटलींत ठेवून ती म्हणाली.

"सोन्याच्या अंड्या, चांदीच्या ताटलींत गरगरा फिरूं लाग अन् मला माझा लाडका फेनिस्ट दाखव बरं!"

सोन्याचं अंडं गरगरा फिरूं लागलं अन् थोड्याच वेळांत तिचा फेनिस्ट तिला दिसूं लागला. ती त्याच्याकडे टक लावून पाहात राहिली व तिच्या नेत्रांतून घळघळा अश्रू वाहूं लागले. मग ती फेनिस्टला म्हणाली,

"लाडक्या फेनिस्ट ! मला बिचारीला डोळ्यांतून पाणी गाळायला लावून तूं कसा रे निघून गेलास ?"

मार्यूश्काचं हें बोलणं राणीनें आडून ऐकलं व ती पुढें येऊन मार्यूश्काला म्हणाली, "तुझी ही चांदीची ताटली अन् सोन्याचं अंडं मला विकत हवंय, मार्यूश्का."

मार्यूश्का उत्तरली, "नाहीं, या वस्तू मी विकणार नाहीं. पण तुम्ही मला फेनिस्ट दाखवाल तर मी त्या जिनसा तशाच तुमच्या स्वाधीन करीन."

राणीनें थोडा विचार केला व ती म्हणाली, "ठीक आहे. आज रात्रीं तो झोंपला म्हणजे मी तुला तो दाखवीन."

अन् मग रात्र झाल्यावर मार्यूश्का फेनिस्टच्या झोंपण्याच्या खोलींत गेली व तिनें त्याला डोळे भरून पाहिलं. तिच्या प्रियकराला गाढ झोंप लागली होती व जागा करूनहि त्याला जाग येईना. तिनें खूप वेळ त्याच्याकडे पाहिलं, नंतर त्याच्या गोड ओठांचं चुंबन घेतलं, त्याला प्रेमानं आलिंगन दिलं, तरीसुद्धां तो जागा झाला नाहीं तो नाहींच. रात्र संपून सकाळ झाली तरी त्याला जागं करण्यांत तिला यश आलं नाहीं.

दुसऱ्या दिवशीं पुनः दिवसभर मार्यूश्का काम करीत होती. संध्याकाळ झाल्यावर तिनें चांदीची चौकट व सोन्याची सुई बाहेर काढली. मग ती सुई झरझर भरतकाम करूं लागली. मार्यूश्का म्हणाली,

"हं. चालूं दे भरतकाम अन् भरतकाम होत असलेल्या रुमाला! माझ्या लाडक्या फेनिस्टचं तोंड पुसण्याच्या कामीं ये बरं!"

राणीनें तें बोलणं ऐकलं व ती मार्यूश्काला म्हणाली,

"मार्यूश्का! तुझी चांदीची चौकट अन् सोन्याची सुई विकतेस मला?"

"मी त्या जिनसा विकणार नाहीं. पण मला फेनिस्टला पाहूं दिलंत तर तशाच भेट म्हणून देईन मी त्या वस्तू."

राणीनें विचार करून उत्तर दिलं, "बरं तर. आज रात्रीं पहा तूं त्याला."

रात्र झाल्यावर मार्यूश्का फेनिस्टच्या खोलींत गेली तेव्हां तो गाढ झोंपलेला होता. ती त्याला हांका मारूं लागली, "ऊठ, माझ्या लाडक्या फेनिस्ट! ऊठ!"

पण फेनिस्टची झोंप उघडली नाहीं. त्याला जागं करण्याचा मार्यूश्कानें हर प्रकारें प्रयत्न केला, पण तो सगळा व्यर्थ गेला.

पहांट झाल्यावर मार्यूश्का पुनः कामाला लागली. रात्रीं तिनें सोन्याची कांडी व चांदीची चाती बाहेर काढली. त्या चातींतून सोन्याचे तंतू निघूं लागले तें राणीनें पाहिले व ती मार्यूश्काकडे त्या जिनसा विकत मागूं लागली. पण मार्यूश्का म्हणाली, "त्या जिनसा

विकायच्या नाहींत, पण तुम्ही मला पुनः एकदां फेनिस्टला पाहूं द्याल तर मी त्या जिनसा तुम्हांला तशाच देऊन टाकीन."

राणीनें विचार केला कीं नाहींतरी ही फेनिस्टला जाग आणूं शकत नाहींच, मग तिचं म्हणणं कबूल करायला काय हरकत आहे?

रात्र झाल्यावर पुनः मार्यूश्का फेनिस्टच्या खोलींत गेली तसा तो आदल्या दोन्ही रात्रींप्रमाणें झोंपलेलाच होता. तिनें त्याला पुष्कळ हांका मारल्या व जागं करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला जाग आली नाहीं. अखेर रात्र संपून दिवस उजाडण्याची वेळ आली तेव्हां मात्र मार्यूश्काचा धीर सुटला व तिला रडूं कोसळलं. मग रडत रडतच ती म्हणाली,

"लाडक्या फेनिस्ट! ऊठ अन् डोळे उघडून या तुझ्या मार्यूश्काला एकदां पहा तरी रे! मला जवळ घे ना माझ्या प्रियकरा!"

हें बोलतां बोलतांच तिच्या नेत्रांतला एक उष्ण अश्रु फेनिस्टच्या उघड्या खांद्यावर पडला व ती जागा भाजून निघाली. त्यामुळें त्याची झोंप एकदम उघडली व तो डोळे उघडून पाहूं लागला तों त्याला मार्यूश्का दृष्टीस पडली. लगेच त्यानें तिला आलिंगन देऊन तिच्या मुखाचं चुंबन घेतलं. मग तो म्हणाला. "खरंच का हें मार्यूश्का? तूं इथें येऊन पोंचलीस! तीन लोखंडी बुटांच्या जोड्या झिजवून, तीन लोखंडी काठ्या मोडून अन् तीन लोखंडी टोप्या फाडून तूं इथें आलीस तर आतां रडूं नकोस, मार्यूश्का! आतां आपण घरीं जाऊं, चल."

त्या दोघांनीं प्रवासाची तयारी सुरू केली. पण राणीनें तें पाहिलं अन् तिनें लगेच साऱ्या राज्यांत माझा नवरा माझा विश्वासघात करून निघून चालला आहे अशी दवंडी पिटवली.

मग राणीच्या राज्यांतले सगळे सरदार न् जमीनदार राणीच्या महालांत एकत्र जमले व त्यांचा दरबार भरून फेनिस्टला काय शिक्षा द्यावी याबद्दल सल्लामसलत सुरू झाली.

मग फेनिस्ट एकदम उठून उभा राहिला व त्यानें सगळ्या दरबारांतल्या लोकांना सवाल टाकला,

" तुम्ही खरी पत्नी कोणाला म्हणाल? जी माझ्यावर खरं प्रेम करते तिला कीं जी माझा सौदा करून मला दगा देते तिला?"

या सवालानंतर मार्यूश्का हीच फेनिस्टची पत्नी होण्याला पात्र आहे, हें कबूल करणं सर्वांनाच भाग पडलं.

हें झाल्यावर मार्यूश्का व तिचा पति फेनिस्ट घरीं परतले. तिथें त्यांनीं आपल्या लग्नानिमित्त अशी थाटाची मेजवानी दिली कीं नंतर अनेक दिवसपर्यंत लोकांना तिचं स्मरण होतं. मेजवानीच्या वेळीं तोफांचा गडगडाट, तुताऱ्यांचे निनाद, एकच धूम उडाली होती. अन् मग त्यानंतर मार्यूश्का व फेनिस्ट अनंत काळपर्यंत सुखानें संसार करीत राहिले.

IRBK-0106988

